


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १६ (६+६+४) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १२.०६.२०२६ | अंक नं. ६२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020






An ISO 9001:2015 Certified

DISHA COMPUTER INSTITUTE

PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT

DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM

Enroll Now
www.dishagroup.in

दिल्ली गेट शाखा 9371051769

जुने बस स्टँड शाखा 9371151769

पाईपलाईन शाखा 7447761769



आशीर्वाद



स्व. अरुणकाका जगताप



## कार्यसम्राट आमदार

### मा.श्री. संग्रामभैय्या जगताप

आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा!





मा.श्री. अर्जुनराव मल्हारी बोरुडे (चेअरमन)



मा.श्री.विकास जगताप (विकीशेठ) (व्हा.चेअरमन)
नगरसेवक,मनपा,अ.नगर

✻ शुभेच्छुक – संचालक मंडळ

श्री. उत्तमराव वामनराव घोगरे
श्री. रामचंद्र बापुराव राळेभात
श्री. राजु मलंगभाई फकिर
श्री. प्रकाश पांडुरंग बोरुडे
श्री. किशोर सुर्यभान गायकवाड
सौ. विद्या विनायक काळे
श्री. प्रकाश कराळे (व्यवस्थापक)

श्री. अनिल देवराम पाचपुते
श्री. प्रशांत सबाजीराव गायकवाड
श्री. नामदेवराव पांडुरंग ढोकणे
श्री. विजय कचरु गायकवाड
श्री. तान्हाजी बाबुराव गायकवाड
सौ. रुक्मिणी गुलाबराव कराळे
सर्व सभासद व कर्मचारी वृंद

सौ. लिलावती युवराज लाळगे
श्री. शंकर बाबुराव गायकवाड
श्री. बाळासाहेब बाजीराव सोनवणे
श्री. प्रकाश महादेव सदाफुले
श्री. सुशांत शांताराम गजे
श्री.व्ही.ए. सांगळे (मानद सचिव)
श्री. तुकाराम बोरुडे (सचिव)

अहिल्यानगर जिल्हा मजूर सहकारी संस्थांचा संघ मर्यादित, अहिल्यानगर
श्रमसहकार, सहकार सभागृहरोड, मार्केटयार्ड पाठीमागे, अहिल्यानगर


# शेअर बाजार सेन्सेक्स १३०० अंकांनी वधारला

मुंबई – आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर १२ जून रोजी दुपारी अडीच वाजेपर्यंत भारतीय शेअर बाजार सेन्सेक्स १३७० अंकांनी वधारून ७५ हजार २०० या उच्चांकी पातळीवर पोहोचला होता तर निफ्टीनेही ३७० अंकांची भर घालत २३,८२० चा टप्पा गाठला. मेटल, बँकिंग आणि रिअॅल्टी क्षेत्रातील शेअर्समध्ये गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केल्याचे दिसून आले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत लवकरच शांतता करार होण्याची सकारात्मक चिन्हे दर्शवल्याने जागतिक बाजारासह भारतीय शेअर बाजारातही मोठी तेजी दिसून आली. इराणचे सर्वोच्च नेते मुजतबा खामेनेई यांनी एका नवीन कराराला मंजुरी दिली असून, त्यानुसार इराण कधीही अणुबॉम्ब विकसित करणार नाही, तसेच होर्मुज स्ट्रेट (समुद्रधुनी) व्यापारी वाहतुकीसाठी खुली केली जाईल, असा दावा ट्रम्प यांनी केला आहे. ट्रम्प यांच्या या दाव्याला जागतिक बाजारासह भारतीय शेअर बाजारानेही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. इराणकडून अद्याप या वृत्ताला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही, तरीही बाजारातील गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास उंचावला आहे. इराणकडून काही नकारात्मक वृत्त आल्यास त्याचा शेअर बाजारावर पुन्हा परिणाम होणार असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

दरम्यान १२ जून रोजी भारतीय शेअर बाजार उघडताच खरेदीचा जोर दिसून आला. बीएसई सेन्सेक्स तब्बल ९०० अंकांच्या वाढीसह ७४,७९९ पातळीवर पोहोचला, तर एनएसई निफ्टी–५० निर्देशांकाने २७५ अंकांची भर घालत २३,४५० चा टप्पा गाठला. केवळ निफ्टी–५०च नव्हे, तर विस्तृत बाजारातही तेजीचे वातावरण आहे. निफ्टी मिडकॅप निर्देशांकात १.३८ टक्के, तर निफ्टी स्मॉलकॅम्प निर्देशांकात १.६२ टक्क्यांची उल्लेखनीय वाढ नोंदवण्यात आली. ही वाढ दुपाऱ्या सत्रानंतरही कायम होती. त्यामुळे शुक्रवार भारतीय शेअर बाजारासाठी आशादायक ठरल्याचे चित्र दिसून आले. काल, ११ जून रोजी शेअर बाजारात संमिश्र कल पाहायला मिळाला होता. आयटी आणि बँकिंग शेअर्समध्ये झालेल्या विक्रीमुळे सेन्सेक्स ५६२ अंकांच्या घसरणीसह ७३ हजार ८३३ वर, तर निफ्टी २३ हजार १६२ च्या पातळीवर बंद झाला होता. मात्र, १२ जून रोजीच्या व्यवहारात बाजाराने ही पिछेहाट भरून काढत दमदार मुसंडी मारली आहे. यात लार्सन अँड टुब्रो, श्रीराम फायनान्स, बजाज फायनान्स, मारुती सुझुकी, ट्रेंट, इटरनल आणि इंटरग्लोब एव्हिएशन हे शेअर्स टॉप गेनर्स ठरले. याउलट, टेक महिंद्रा आणि ओएनजीसी या शेअर्समध्ये मात्र काही प्रमाणात विक्रीचा दबाव दिसून आला.








चंदुकाका ज्वेल्स, सावेडी या सुवर्णदालनाच्या ११व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमावेळी दीपप्रज्वलन करतांना अहिल्यानगरचे लाडके आमदार मा.श्री. संग्रामभैय्या जगताप

अहिल्यानगरचे लाडके आमदार

## मा.श्री. संग्रामभैय्या जगताप

आपणांस वाढदिवसाच्या लक्ष-लक्ष शुभेच्छा !

चंदुकाका ज्वेल्स

शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02







## समाजसेवेचा ध्यास विकासाचा विश्वास

## हिंदूधर्मरक्षक

माननीय आमदार

## संग्रामभैय्या जगताप

आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

– शुभेच्छुक –

मयूर मुनोत | रोहित चंगेडिया | दर्शन चानोदिया

सिद्धांत प्लाय ॲण्ड हार्डवेअर



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १२.०६.२०२६ | अंक नं. ०६२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

















SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
ह्या सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो
बर्डपार्क / झीप लाईन
ॲडव्हेंचरर्स / वॉटर स्पोर्टस
साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

रजि नं. ११४३९-५७/३७ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १२.०६.२०२६ | अंक नं. ०६२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## महिलेच्या कागदपत्रांचा गैरवापर करत 'लोन' वर घेतली दुचाकी

### एमआयडीसी परिसरातील घटना; संशयितावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

नगर - एमआयडीसी परिसरात दत्तनगर येथे राहणाऱ्या एका महिलेचा विश्वास संपादन करून तिच्या नावावर परस्पर लोन वर दुचाकी खरेदी करत फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. आरोपीने महिलेशी ओळख वाढवून, तिच्याकडून कागदपत्रे घेतली आणि तिचा विश्वासघात केला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी रणजित भोसले याने फिर्यादी महिलेला वारंवार फोन करून तिच्याशी तोंडओळख वाढवली होती. तो नेहमी तिच्याशी गोड बोलत असे. या गोड बोलण्याच्या जाळ्यात ओढून त्याने महिलेचा पूर्ण विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपीने महिलेच्या नावावरील कागदपत्रांचा वापर करून एक दुचाकी गाडी खरेदी केली. इतकेच नव्हे तर या गाडीवर एका नामांकित फायनान्स कंपनीकडून कर्जदेखील मंजूर करून घेतले.

हा सर्व प्रकार महिलेच्या लक्षात आल्यानंतर तिने आरोपीकडे विचारणा केली. मात्र, त्याने असा कोणताही प्रकार केला नसल्याचे सांगत हात झटकले.

आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्यानंतर महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणी भा.दं.वि. कलम ४०६ नुसार गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस हवालदार पितळे करत आहेत.

# पाणी व वीज चोरीप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'अनोखे आंदोलन'; अधिकाऱ्यांना 'राष्ट्रीय भ्रष्टोबा' घोषित करून दगडांना शेंडी-शेंदूर लावून निषेध

नगर - कथित पाणी चोरी व वीज चोरीप्रकरणी वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागांकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचा आरोप करत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना प्रतीकात्मक स्वरूपात 'राष्ट्रीय भ्रष्टोबा' घोषित करून त्यांच्या निषेधार्थ दोन दगडांना शेंडी-शेंदूर लावण्यात आला. तसेच त्यांच्या डोक्यात प्रकाश पडावा आणि जनतेच्या समस्या समजाव्यात यासाठी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाचे प्रतिकात्मक प्रतिमा अर्पण करण्यात आले.

या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, प्रकाश थोरात, अशोक सब्बन, रवी सातपुते, शंकर साळवे, तुकाराम बोरगे, पोपट भोसले, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. अमित थोरात, बाळासाहेब पालवे, वीरबहादूर प्रजापती, वाय. के. शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मौजे पळशी (ता. पारनेर) येथील खांबळी पाझर तलावासाठी महाराष्ट्र शासनाने १९८६ साली जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यानंतर तलावाचे काम सुरू होऊन १९९० मध्ये तलाव पूर्णत्वास गेला. मात्र, तलाव परिसरातील काही व्यक्तींनी शासनाची परवानगी न घेता तलावाच्या हद्दीत बेकायदेशीरपणे विहिरी खोदल्या असल्याचा आरोप करण्यात आला. तसेच वीज वितरण कंपनीची अधिकृत परवानगी न घेता बेकायदेशीर वीजजोडणी करून किंवा आकडे टाकून विजेच्या मोटारी चालविण्यात येत असल्याचा गंभीर आरोपही आंदोलकांनी केला. या मोटारींच्या साहाय्याने तलावातील पाणी दूरवरच्या शेतांमध्ये नेऊन मोठ्या प्रमाणावर बागायती शेती केली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

खांबळी पाझर तलावाच्या खालील भागात गाडेझाप परिसरातील सुमारे २०० ते २५० नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामपंचायतीमार्फत सरकारी खर्चातून विहीर बांधण्यात आली आहे. तसेच या भागातील जनावरे, शेळ्या, बकऱ्या आणि आदिवासी बांधवांच्या दैनंदिन गरजांसाठी हा तलाव अत्यंत महत्त्वाचा असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

**अधिकाऱ्यांच्या डोक्यात प्रकाश पडण्यासाठी पसायदानाचे प्रतिकात्मक प्रतिमा अर्पण**



पाणी व वीज चोरीप्रकरणी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन करण्यात आले.

तलावाच्या आसपास ५०० मीटर परिसरात कोणालाही विहीर खोदण्याचा अथवा पाण्याचा उपसा करण्याचा अधिकार नसल्याचे नमूद करत, या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात आला. तलावातील पाणी कमी झाल्यास स्थानिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या स्रोतावर तसेच शेतीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

या प्रकरणी मृद व जलसंधारण विभाग, वीज वितरण कंपनी तसेच इतर संबंधित कार्यालयांकडे वेळोवेळी तक्रारी, अर्ज आणि निवेदने देण्यात आली. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृदा व जलसंधारण उपविभाग पारनेर आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे संबंधित अधिकारी यांच्यावर दुर्लक्ष केल्याचा तसेच भ्रष्टाचारातून हप्ते घेऊन बेकायदेशीर प्रकारांना संरक्षण दिल्याचा गंभीर आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. बेकायदेशीर मोटारी जप्त करण्यात आल्या नाहीत तसेच संशयित वीजजोडण्या खंडित करण्यात आल्या नसल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

आंदोलकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून खांबळी पाझर तलावातील कथित पाणी चोरी आणि वीज चोरीची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. तसेच संबंधित विभागातील कामचुकार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करून त्यांना शासकीय व निमशासकीय सेवेतून कायमचे बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली आहे. जनतेच्या हितासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून पाझर तलावाचे संरक्षण करावे, पाणी व वीज चोरी रोखावी आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

या मागणीचे निवेदन मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलन स्थळी येऊन स्विकारले.

## भरवस्तीत घर फोडून सोन्याच्या दागिन्यांसह रोख रकमेची चोरी

नगर - नगर तालुक्यातील चास परिसरात एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत काशिनाथ रामभाऊ कार्ले (वय ४४, रा. चास, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आपल्या कुटुंबासह राहतात. १० जूनच्या रात्री १० ते ११ जूनच्या सकाळी ६ वाजेच्या दरम्यान चोरट्यांनी त्यांच्या घराला लक्ष केले. फिर्यादी यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरांनी घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटातून ७० हजार रुपये किमतीच्या अर्धा तोळा वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या आणि २५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

सकाळी चोरीचा हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी पोलिसांशी संपर्क साधला. या घटनेची माहिती मिळताच नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे आणि पोलीस अंमलदार दाते यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फिर्यादी कार्ले यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार भवार करत आहेत. भरवस्तीत झालेल्या या चोरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे.

## जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल, अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्या

नगर - पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल करत अनेक महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकार्यांच्या बदल्या केल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे (एलसीबी) पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांच्यासह श्रीरामपूर शहर, राहुरी, नेवासा, पाथर्डी, नगर शहरातील तोफखाना, कोतवाली, भिंगार कॅम्प, एमआयडीसी तसेच श्रीगोंदा, घारगाव आदी पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकार्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. काही अधिकार्यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांची बदली करण्यात आली असून काहींची मुदतपूर्व बदली करण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे किरण कबाडी यांची बदली शिर्डी येथील साई मंदिर सुरक्षा विभागात करण्यात आली आहे. दरम्यान, एलसीबीला अद्याप पूर्णवेळ प्रभारी देण्यात आलेला नसून सहायक पोलीस निरीक्षक हरीष भोये यांच्याकडे तात्पुरता पदभार सोपविण्यात आला आहे.बदली करण्यात आलेले अन्य अधिकारी व त्यांची पोस्टिंग पुढीलप्रमाणे.

पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ तोफखाना ते नियंत्रण कक्ष. रवींद्र देशमुख नियंत्रण कक्ष ते राहुरी पोलीस ठाणे. विलास पुजारी पाथर्डी पोलीस ठाणे ते मानव संसाधन विभाग. संभाजी गायकवाड कोतवाली पोलीस ठाणे ते दहशतवाद विरोधी पथक अहिल्यानगर. किरण शिंदे श्रीगोंदा पोलीस ठाणे ते ए एच टी यु अहिल्यानगर. संजय ठेंगे राहुरी पोलीस ठाणे ते श्रीगोंदा पोलीस ठाणे, नितीन देशमुख श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे ते कोतवाली पोलीस ठाणे, आनंद कोकरे मानव संसाधन विभाग ते पाथर्डी पोलीस ठाणे, प्रताप दराडे नियंत्रण कक्षेते नेवासा पोलीस ठाणे, बाबासाहेब बोरसे शहर वाहतूक शाखा ते घारगाव पोलीस ठाणे, महेश पाटील नियंत्रण कक्ष ते शहर वाहतूक शाखा, दीपक सरोदे नियंत्रण कक्ष ते राहता पोलीस ठाणे, बालाजी वैद्य ए एच टी यु ते तोफखाना पोलीस ठाणे, हनुमान गायकवाड नियंत्रण कक्ष ते कर्जत पोलीस ठाणे,

स.पो.नि. युवराज आठरे आर्थिक गुन्हे शाखा ते लोणी पोलीस ठाणे. स.पो.नि.माणिक चौधरी एमआयडीसी पोलीस ठाणे ते आर्थिक गुन्हे शाखा, जगदीश मुलगीर भिंगार कॅम्प ते आर्थिक गुन्हे शाखा, तेजश्री थोरात कोतवाली पोलीस ठाणे ते भिंगार कॅम्प पोलीस ठाणे, हेमंत थोरात घारगाव पोलीस ठाणे ते एमआयडीसी पोलीस ठाणे.

बदल्यांच्या आदेशामध्ये नमूद केल्यानुसार बदली झालेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ नव्या ठिकाणी पदभार घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## व्हॉट्स ॲपवर आलेली आरटीओ ई चालान एपीके फाईल ओपन केली अन् बँक खात्यातून २.२५ लाख झाले गायब

### नगरमधील महिलेची ऑनलाईन फसवणूक

नगर - व्हाट्स ॲपवर आलेली आरटीओ ई चालान एपीके फाईल ओपन केली आणि महिलेच्या बँक खात्यातून २ लाख २५ हजार रुपये गायब झाल्याचा प्रकार नगरमध्ये उघडकीस आला आहे. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर गुन्हेगारांच्या विरोधात ११ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अरणगाव रोडवरील हनुमाननगर येथे राहणाऱ्या महिलेने फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिलेचे पती गॅस वितरणाचे काम करतात. ते सावेडी उपनगरात मिस्कीन मळा परिसरात गॅस टाक्या वितरणाचे काम करत असताना त्यांच्या मोबाईलच्या व्हाट्स ॲपवर एका अनोळखी क्रमांकावरून वाहतूक पोलिसांच्या दंडाचे बनावट डिजिटल पत्रक (आरटीओ ई चालान एपीके फाईल ) आले होते. ते पत्रक खरे असल्याचे समजून त्यांच्याकडून चुकून डाऊनलोड झाले. त्यानंतर त्यांचा मोबाईल हॅक झाला. त्यांच्या मोबाईल वरून इतरांना फोन जावू लागले. मोबाईलमध्ये तांत्रिक अडचण आल्याने त्यांनी मोबाईल कंपनीच्या कस्टमर केअरला फोन लावला. समोरील अज्ञात व्यक्तीने ओळख पटवण्याच्या बहाण्याने त्यांच्याकडून आधारकार्डचे शेवटचे चार अंक मागवून घेतले. ही माहिती देताच अवघ्या काही वेळातच त्यांचा मोबाईल जोडलेल्या त्यांच्या पत्नीच्या बँक खात्यातून सुरुवातीला एक लाख, त्यानंतर पुन्हा एक लाख आणि शेवटी पंचवीस हजार रुपये असे एकूण २ लाख २५ हजार रुपये चोरट्यांनी बेकायदेशीरपणे काढून घेतले.

पैसे कपात झाल्याचा संदेश मिळताच पीडित कुटुंबाने तात्काळ राष्ट्रीय सायबर गुन्हे कक्षाशी संपर्क साधून तक्रार नोंदवली. प्राथमिक चौकशीत या रकमेतील १ लाख ८४ हजार रुपये ४ वेगवेगळ्या संशयास्पद बँक खात्यांमध्ये वर्ग झाल्याचे समोर आले आहे. तोफखाना पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. नागरिकांनी कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये किंवा आधार कार्डची माहिती अनोळखी व्यक्तीला देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### विनय मंडलेचा यांचे संथाराव्रतात निधन



नगर - संताजीनगर, जामखेड येथील रहिवासी विनय लालचंद मंडलेचा (वय ६२) यांचे ११ जून रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जामखेड, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

### सुभाष ढाकेफळकर यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर - शहरातील दंत तंत्रज्ञ सुभाष सी. ढाकेफळकर (वय ८०) यांची प्राणज्योत दीर्घ आजाराने मालवली. नगरमधील एस.के. कुलकर्णी दातांचा दवाखाना येथे त्यांनी प्रदीर्घ काळ सेवा केली. त्यांच्या मागे पत्नी शोभा, मुलगा डॉ. रोहित, मुलगी सौ.शिल्पा, सुन डॉ. पूर्वा, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

### ताराबाई कोठूळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - खडकी (ता.नगर) येथील रहिवासी ताराबाई भाऊसाहेब कोठूळे (वय ९०) यांचे १२ जून रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रघुनाथ, बाळासाहेब यांच्या त्या मातोश्री होत.

### स्वप्निल काळे यांचे दुःखद निधन

श्रीरामपूर - येथील स्वप्निल अशोक काळे (वय ३५) यांचे दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात आई - वडील, चुलते, दोन बहिण, चुलत बंधू असा परिवार आहे. बेलापूररोड, साधना हॉटेल जवळील रहिवासी अशोक गोविंदराव काळे यांचे चिरंजीव, स्वस्त धान्य दुकानदार रविंद्र काळे यांचे पुतणे, प्रवीण, सचिन, मनोज व किरण काळे याचे चुलत बंधू होत.

## किराणा दुकानातून रोख रकमेसह पावणेदोन लाखांच्या मुद्देमालाची चोरी

### जाताना चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे फोडून डिव्हीआरही पळवून नेला

नगर - नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे गजबजलेल्या छत्रपती चौकात असलेल्या एका किराणा दुकानाचे शटर उघडून आत प्रवेश करत चोरट्यांनी दुकानातील विविध साहित्य, रोकड असा एकूण १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. जाताना चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे फोडून डिव्हीआर ही पळवून नेला आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गणेश अनिल कडूस (रा.सारोळा कासार, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे गावातच केटरिंग आणि किराणा दुकान आहे. १० जून रोजी रात्री दुकान बंद केल्यानंतर ते घरी गेले होते. दरम्यान, रात्री १० वाजेपासून ते ११ जून रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या दुकानाला लक्ष केले. चोरट्यांनी दुकानाचे शटर उघडून आत प्रवेश केला. दुकानात ठेवलेले १ लाख रुपयांचे किराणा सामान, ज्यामध्ये गावरान तूप, सुकामेवा, तेल डब्बे, चहापावडर, सिगारेट आणि मसाल्यांचा समावेश होता ते तसेच गल्ल्यातील ८० हजार रुपयांची रोकडही चोरून नेली. तसेच पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने दुकानातील ५ हजार रुपये किमतीचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डिव्हीआर मशीन चोरट्यांनी लंपास केली.

सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर गणेश कडूस यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

पुढील तपास पोलीस हवालदार लाड करत आहेत. पोलीस आता परिसरातील इतर सीसीटीव्ही आणि गुप्त माहितीच्या आधारे अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

## पूर्ववैमनस्यातून एका महिलेसह तिच्या आईला बेदम मारहाण

### बंगाल चौकी परिसरातील घटना, ४ महिलांवर गुन्हा दाखल

नगर - शहर परिसरातील बंगाल चौकी जवळील बर्फाच्या दुकानासमोर एका महिलेला आणि तिच्या आईला लाकडी दांडक्याने व दगडाने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चार महिलांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत वनिता रामदास जगधने (रा. श्रीकृष्णनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी आरोपींना 'माझ्या आईला धक्काबुक्की का केली?' असा जाब विचारला होता. याचाच राग मनात धरून आरोपी बारकी अशोक क्षिरसागर, दगी नितीन क्षिरसागर, मनिषा युवराज रणशिंग आणि तनु (पूर्ण नाव माहीत नाही, सर्व रा. रामवाडी, सर्जेपुरा) यांनी मिळून फिर्यादी महिला आणि त्यांच्या आईला गाठले. आरोपींनी दोन्ही महिलांना रस्त्यावरच लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी लाकडी दांडके आणि दगडाने पीडित महिलेच्या पाठीवर गंभीर वार करून तिला जखमी केले.

या घटनेदरम्यान आरोपींनी दोन्ही महिलांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकीही दिली. या हल्ल्यानंतर जखमी महिलेला उपचारासाठी तातडीने सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. याप्रकरणी पीडित महिलेने कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी ४ महिलांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी न्यायालयीन खटल्यात अहिल्यानगरचे ॲड.परिमल फळे मांडणार सरकारची बाजू

### ॲड.उज्ज्वल निकम यांच्यासह फळे यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

नगर - राज्यभर गाजलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणातील न्यायालयीन खटल्यात सरकारची बाजू अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी राज्य सरकारने अहिल्यानगर येथील नामवंत फौजदारी वकील ॲड. परिमल फळे यांची सहायक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. यासंदर्भातील अधिसूचना राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाने ११ जून रोजी जारी केली असून, या निर्णयामुळे खटल्याच्या सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

या अत्यंत संवेदनशील प्रकरणात राज्य सरकारने यापूर्वीच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. आता त्यांना ॲड. परिमल फळे यांच्यासारख्या निष्णात फौजदारी वकिलाची साथ मिळणार आहे. विधी व न्याय विभागाचे कक्ष अधिकारी राजेश मांजरेकर यांनी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, आता हे दोन्ही कायदेतज्ज्ञ मिळून अशोक खरात याच्याविरोधातील न्यायालयीन लढाईत सरकारची बाजू मांडणार आहेत.

ॲड. परिमल फळे हे फौजदारी कायद्यातील अभ्यासू आणि अनुभवी वकील म्हणून ओळखले जातात. यापूर्वी राहुरी येथील आढाव वकील दाम्पत्य हत्या प्रकरण आणि नेवासे येथील रियाज पठाण हत्या प्रकरण यांसारख्या अत्यंत चर्चित प्रकरणांमध्ये ॲड. उज्ज्वल निकम यांच्यासोबत ॲड. फळे यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक गाजलेल्या खटल्यांमुळे ॲड. फळे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. यामध्ये बहुचर्चित रेखा जरे खून प्रकरण, संदीप वराळ हत्या प्रकरण (निघोज, ता. पारनेर) यांसारख्या गुंतागुंतीच्या प्रकरणांमधील त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली आहे. विविध महत्त्वाच्या फौजदारी खटल्यांमध्ये त्यांनी बजावलेल्या यशस्वी भूमिकेमुळे त्यांच्यावर सरकारने पुन्हा एकदा विश्वास दर्शविला आहे.



विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांच्यासोबत ॲड. परिमल फळे.

आता भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात ॲड. निकम आणि ॲड. फळे ही अनुभवी जोडी एकत्र आल्याने या खटल्याच्या पुढील सुनावणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, या प्रकरणाचा निकाल काय लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## रिल्सचे व्यसन, मेंदूला मारक

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियावरील रिल्स हे मनोरंजनाचे सर्वात लोकप्रिय साधन बनले आहे. काही सेकंदांचे हे व्हिडीओ आकर्षक असल्याने अनेक जण दिवसातून तासन्तास रिल्स स्क्रोल करत बसतात. एवढेच काय तर कामातून फक्त काही मिनिटांचा वेळ मिळाला, तसेच झोपताना आणि झोपण्याच्या आधी देखील रिल्स पाहिल्या जातात. हे आश्चर्यकारक वाटेल, पण रिल्स पाहता पाहता अनेकजण त्यांना भूक लागली आहे हे देखील विसरतात. अशा व्यक्तींना 'रिल्स ॲडिक्ट' असे म्हटले जाते. कारण सततची रिल्स पाहण्याची सवय कोणत्याही व्यसनापेक्षा कमी नाही. तज्ज्ञांच्या मते ही सवय मेंदूवर गंभीर परिणाम करू शकते आणि हळूहळू मानसिक आरोग्याचे नुकसान होण्याची शक्यता वाढते.



रिल्समध्ये नवीन, मनोरंजक सामग्रीचा सतत प्रवाह मेंदूमध्ये जलद गतीने आणि वारंवार डोपामाईन सोडण्याचा मदत करतो. ज्यामुळे इतर व्यसनांप्रमाणे तृष्णा आणि आवेगपूर्ण वर्तनाचे चक्र तयार होते. यामुळे मेंदूची लक्ष केंद्रित करण्याची क्षमता कमी होते आणि अभ्यास किंवा काम कंटाळवाणे वाटू लागते. कोणतेही काम करताना किंवा वाचताना लक्ष एकाग्र करणे कठीण होते. सतत आणि जलद डोपामाईनमुळे तुमच्या मेंदूवर नकारात्मक परिणाम होऊन गोष्टी लगेच विसरणे, लक्षात ठेवण्याची क्षमता कमी होणे, आकलन क्षमता मंदावणे अशा समस्यांना सामोरे जावे लागते.

या समस्या पुढे गंभीर स्वरूप घेऊन अल्झायमरसारखे आजार होण्याची शक्यता असते. डोपामाईन हे मेंदूमधील एक असे रसायन आहे, जे मेंदूला उत्तेजित करण्याचे कार्य करते. रिल्स ॲडिक्शनमुळे तुमचा मेंदू उच्च-उत्तेजना या समस्येला बळी पडतो. ज्यामुळे चिंता, नैराश्य, न्यूनगंड अशा मानसिक समस्या उद्भवतात. सोशल मीडियावरील या रिल्समध्ये काल्पनिक जीवनशैली, सौंदर्य, स्टायलीश राहणीमान अशाप्रकारचा मजकूर दाखवणारे व्हिडीओज असतात. या रिल्स सतत पाहिल्याने तुम्ही तुमच्या सामान्य जीवनशैलीची आणि स्वतःची तुलना करू लागता. यामुळे तुमच्या मनात तुम्ही जीवनाच्या इतर क्षेत्रात तुमच्या पूर्ण क्षमतेनुसार कामगिरी करण्यास असमर्थ असण्याची भावना निर्माण होऊ शकते.

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार सतत रिल्स पाहिल्याने झोपेची गुणवत्ता कमी होते. मोबाईल स्क्रीनची ब्ल्यू-रेज आणि मेंदूची सतत चालू असलेली जागरूकता यामुळे झोप उशिरा लागते आणि सकाळी थकवा जाणवतो. इतकेच नाही तर वारंवार माहितीची भर पडल्यामुळे अल्पकालीन स्मृतीवरही परिणाम होऊ शकतो. रिल्स ॲडिक्शन टाळण्यासाठी रिल्स पाहण्याच्या मर्यादित वेळा ठरवा, झोपेच्या आधी सोशल मीडियाचा वापर टाळा आणि दिवसातून एकदा तरी डिजिटल डिटॉक्स करा. नवीन सामग्री तपासण्याचा मोह टाळण्यासाठी सोशल मीडियाचे नोटिफिकेशन बंद करून ठेवा, तुमचा रिकामा वेळ घालवण्यासाठी मोबाईल व्यतिरिक्त इतर साधनांचा उपयोग करा.

## आढळले 'सोन्याचे शहर'

जगभरातील पुरातत्त्वशास्त्रज्ञ हजारो वर्षांपूर्वीच्या कलाकृतींचा शोध घेत आहेत. अशातच इजिप्तमधील पुरातत्त्वशास्त्रज्ञांच्या पथकाने मोठे संशोधन केले आहे. संशोधकांना ३,००० वर्षे जुने 'सोन्याचे शहर' सापडले आहे, जिथे एकेकाळी सोन्याचे खाणकाम केले जात असे. इजिप्तच्या भूदृश्याने जगभरातील पुरातत्त्वशास्त्रज्ञांना भुरळ घातली आहे. हजारो वर्षे जुन्या संस्कृतीचे घर असलेल्या या देशात अजूनही असंख्य रहस्ये आहेत. पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी त्याच्या मातीत खोलवर दडलेले असेच एक रहस्य उलगडले आहे. अनेक वर्षांच्या बारकाईने उत्खननानंतर त्याचे पुनर्संचयितीकरण आता पूर्ण झाले आहे.


२०२१ मध्ये इजिप्तशास्त्रज्ञांना 'हरवलेले सुवर्ण शहर' असे म्हटले जाणारे शहर सापडले होते. त्यावेळेपासून तिथे हे संशोधन सुरु होते. इजिप्तच्या लाल समुद्रातील गव्हर्नरेटमधील मार्सा आलमच्या नैऋत्येस असलेले जबल सुक्री हे ठिकाण १००० इ.स.पूर्व पासून औद्योगिक क्रियाकलापांचे केंद्र होते. अलीकडील संशोधनातून असे दिसून आले आहे की, सोन्याच्या खाणकाम आणि प्रक्रियेत या जागेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती, ज्यामध्ये सोने काढण्यासाठी रचना करण्यात आल्या होत्या.

पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी या जागेला अलीकडच्या काळात झालेल्या सर्वात मोठ्या पुरातत्त्वीय शोधांपैकी एक म्हटले आहे. इजिप्तच्या सर्वोच्च पुरातन वास्तू परिषदेचे सरचिटणीस डॉ. मोहम्मद इस्माईल खालेद म्हणाले की, उत्खननात सोन्याच्या प्रक्रिया स्थळाचे अवशेष आढळले आहेत. ज्यामध्ये दळणे आणि क्रशिंग स्टेशन, गाळण्याचे बेसिन आणि सोने वितळवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मातीच्या भट्ट्यांचा समावेश आहे. या संशोधानवरून असे दिसून येते की, हे ठिकाण इजिप्तच्या प्राचीन सोन्याच्या व्यापाराचा एक महत्त्वाचा भाग होता. या ठिकाणी टॉलेमिक काळातील नाणीदेखील सापडली आहेत, ज्यावरून असे सूचित होते की, हे ठिकाण बराच काळ सक्रिय होते.

इजिप्तचे पर्यटन आणि पुरातन वास्तू मंत्री शेरीफ



फाथी म्हणाले की, उत्खननामुळे प्राचीन इजिप्शियन खाण कामगारांच्या अभियांत्रिकी आणि तांत्रिक कौशल्यावर प्रकाश पडतो, ज्यांनी कठोर वाळवंटातील लँडस्केपमध्ये सोने काढण्यासाठी अत्याधुनिक पद्धती विकसित केल्या. डॉ. खालेद यांनी अधोरेखित केले की, ग्राइंडिंग आणि चाळणी केंद्रांचे अवशेष दाखवतात की, इजिप्शियन लोकांनी क्वार्ट्जपासून सोने वेगळे करण्याची प्रक्रिया कशी पारंगत केली. सोने वितळवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मातीच्या भट्ट्यांचा शोध पुष्टी करतो की, हे ठिकाण केवळ खाण चौकीच नव्हते, तर पूर्णपणे कार्यरत प्रक्रिया केंद्रदेखील होते.



## मंगळावरचे विवर हुबेहूब फुलपाखरासम

युरोपियन स्पेस एजन्सीच्या मार्स एक्स्प्रेस मोहिमेने मंगळाच्या पृष्ठभागावर एका विशाल आणि विलक्षण नैसर्गिक कलाकृतीचे छायाचित्रण केले आहे. ही कलाकृती म्हणजे एक फुलपाखराच्या आकाराचे मोठे विवर आहे. हे विवर सुमारे २० किलोमीटर रुंद (पूर्व ते पश्चिम) आणि १५ किलोमीटर लांब (उत्तर ते दक्षिण) आहे. मंगळाच्या उत्तर सखल प्रदेशातील आयडियस फॉसी भागात हे विवर आढळले आहे.


युरोपियन स्पेस एजन्सीनुसार, हे फुलपाखरूसारखे दिसणारे विवर एका उथळ कोनातून झालेल्या आकाशातील वस्तूच्या टकरामुळे तयार झाले आहे. जेव्हा एखादा दगड कमी कोनातून आदळतो, तेव्हा आघाताची ऊर्जा विषमपणे पसरते, ज्यामुळे दोन्ही बाजूंना पंखांसारखे दोन मोठे भाग तयार होतात. या पसरलेल्या पंखांच्या मध्यभागी असलेला लांबट मध्यवर्ती खड्डा फुलपाखराचा आकार पूर्ण करतो. मार्स एक्स्प्रेस या दीर्घकाळ चाललेल्या मोहिमेवरील उच्च रिझोल्यूशन स्टिरिओ कॅमेऱ्यातून या भूभागाचे एक अप्रतिम त्रिमितीय छायाचित्र प्राप्त झाले आहे.

आघातामुळे बाहेर फेकलेल्या आणि वेळेत गोठलेल्या सामग्रीमुळे तयार झालेल्या दऱ्या या छायाचित्रात दिसतात. आयडियस फॉसी प्रदेशात भेगा आहेत. त्यामुळे मंगळाच्या कवचाच्या ताण आणि पतनाच्या दीर्घ भूगर्भीय इतिहासाची मिळण्यास मदत होते. २००४ पासून कार्यरत असलेल्या मार्स एक्स्प्रेसने मंगळाच्या पृष्ठभागाचे आणि वातावरणाचे अनेक तपशीलवार जागतिक नकाशे तयार केले आहेत. तसेच, मंगळाच्या जलमय भूतकाळावर या मोहिमेने प्रकाश टाकला आहे. हे नवीनतम छायाचित्र विज्ञान आणि कलेचे दर्शन घडविणारे ठरले आहे. त्यामुळे ग्रहांवरील आघात पृथ्वीवरील नैसर्गिक आकारांची आठवण करून देणाऱ्या प्रतिमांमध्ये मंगळाला कसे आकार देतात, हे स्पष्ट होते.

## चौदाव्या वर्षी चौदा भाषा येणारी 'सर्पमैत्रीण'

आजच्या युगात जिथे बहुतांश लहान मुले मोबाईल आणि डिजिटल स्क्रीनमध्ये रमलेली असतात, तिथे १४ वर्षांच्या अनन्या विश्वेशने एक पूर्णपणे वेगळा मार्ग निवडला आहे. इतरांचे वीकेंडसब व्हिडीओ गेम्स आणि सोशल मीडियावर जातात, तर अनन्यासाठी वीकेंड म्हणजे जंगलाच्या पायवाटा, पानांची सळसळ आणि वन्यजीवनाचे रोमांच अनुभवणे आहे. निसर्गाशी असलेले तिचे हे नाते तिला केवळ खास बनवत नाही, तर तिच्यासाठी जीवनातील सर्व चांगल्या शक्यतांचे द्वार उघडते. ७५ सापांना वाचवणारी आणि सहा भाषा शिकलेली ही चौदा वर्षीय कन्या इतरांसाठी प्रेरणादायक बनलेली आहे.

या मुलीची कहाणी आपल्याला विचार करण्यास लावते की, जर लहान मुलांनी किंवा मोठ्यांनीही मोबाईल स्क्रीनसमोर राहण्याऐवजी निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवला, तर त्यांचे जग किती बदलू शकते. केरळची १४ वर्षीय अनन्या विश्वेश याचे उत्तम उदाहरण आहे. तिच्या आयुष्यातील प्रत्येक वीकेंडमध्ये जंगल, पायवाटा आणि वन्यजीवनाचा समावेश असतो. शेजारच्या कोणाला साप दिसला किंवा केरळ वन विभागाला एखाद्या बचावासाठी



मदतीची गरज भासली, तर सर्वात आधी अनन्याला बोलवले जाते.

अनन्याचा विश्वास आहे की, 'होमस्कूलिंग'मुळे तिला निसर्गाला जवळून पाहण्याची संधी मिळाली. तिच्या पालकांनी लहानपणापासूनच तिच्या या आवडीला प्रोत्साहन दिले. पाचवीत असताना ऊटीला केलेली एक सहल तिच्या आयुष्यातील 'टर्निंग पॉईट' ठरली, अशी आठवण ती सांगते. त्या प्रवासानंतर तिला जंगल इतके आवडू लागले की तिने आपल्या पालकांना शहर बदलण्यासाठी राजी केले. कोव्हिड महामारीच्या काळात तिला ऊटीच्या जंगलांना समजून घेण्यासाठी आणि त्यांचा शोध घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला. हळूहळू ती आजुबाजूच्या लोकांशी आणि निसर्गप्रेमींशी जोडली गेली. निलगिरीची जैव-विविधता आणि तेथील दुर्मीळ जीव तिच्या आयुष्याचा भाग बनले.

जंगल सफारी गाईड तिचे मित्र झाले आणि स्थानिक लोकांनीही तिला ओळखायला सुरुवात केली. याच दरम्यान, मासिनागुडी इको नॅचरलिस्ट क्लब नावाच्या एका स्वयंसेवी संस्थेने तिच्याशी संपर्क साधला आणि ती त्या संस्थेची सर्वात कमी वयाची सदस्य बनली. सुरुवातीला अनन्याच्या वडिलांनी होमस्कूलिंगला मान्यता दिली नव्हती, पण जसजसे त्यांना आपल्या मुलीचे वन्यजीवनाबद्दलचे प्रेम समजले, तसतसे ते तिच्यासोबत जंगल यात्रांवर जाऊ लागले. अनन्याला केवळ छंद म्हणून नव्हे, तर खऱ्या अर्थाने वन्यजीव संवर्धनाशी जोडले जायचे आहे, हे त्यांना जाणवले. जंगलाने तिला केवळ सुंदर दृश्येच दाखवली नाहीत, तर काही कटू सत्यही शिकवले. एकदा एका हत्तीच्या शवविच्छेदनादरम्यान त्याच्या पोटातून प्लास्टिकचा ढीग बाहेर पडला. ही घटना पाहून अनन्या आणि तिचे वडील दोघेही हादरले.

याच घटनेने अनन्याला जागरूकता पसरवण्याच्या दिशेने प्रेरित केले. आता केरळला परतल्यानंतरही अनन्या तिचा प्रत्येक मोकळा क्षण जंगलात घालवते. तिला जंगलातील प्रत्येक जीवावर प्रेम आहे, विशेषतः हत्तींवर. सोशल मीडियाचा वापर ती केवळ मनोरंजनासाठी नाही, तर शिकण्यासाठी, जागरूकता वाढवण्यासाठी आणि स्वयंसेवकाच्या नवीन संधी शोधण्यासाठी करते. आज अनन्या पलक्कड येथील सर्प बचावकर्त्यांसोबत काम करते. तिने ११ व्या वर्षी हर्पेटोलॉजीमध्ये (Herperoplogy-सरपटणाऱ्या प्राण्यांचा अभ्यास) ज्युनियर मास्टर्स डिग्री पूर्ण केली होती, ज्यामुळे तिला सापांना समजून घेण्यास आणि वाचविण्यात मदत मिळाली. आतापर्यंत तिने ७५ हून अधिक सापांना वाचवले आहे. ती मुलांना जंगलाच्या गोष्टी सांगते, त्यांना निसर्गाशी जोडते आणि एका दिवसाच्या नेचर कॅम्पमध्ये त्यांना जंगलाच्या जवळ घेऊन जाते. सहा भाषांचे ज्ञान असल्यामुळे मुलांना समजून सांगणे तिला सोपे जाते. आतापर्यंत तिने ९,५०० हून अधिक मुलांना निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला आहे.



## हृदयाच्या बळकटीसाठी...

खाण्यापिण्याच्या सवयी आपले व्यक्तिमत्त्व घडवित असतात, त्याचा संबंध थेट आरोग्याशीही असतो. धकाधकीच्या जीवनात या सवयी बदलत असल्या तरी काही पथ्ये पाळली आणि तंतूयुक्त आहाराचा पुरेसा वापर ठेवला तर आरोग्यासाठी ते उपकारकच ठरते, असे तज्ज्ञ सांगतात.

तुम्ही कदाचित ऐकले असेल की, जास्त फायबर खाणे तुमच्या आतड्यांसाठी चांगले आहे. परंतु, त्याचे फायदे पचनापेक्षा खूप जास्त आहेत. फायबर तुमच्या हृदयाचे रक्षण करण्यातही एक शक्तिशाली भूमिका बजावू शकते. अगदी रक्तदाब स्थिर ठेवण्यापासून ते एलडीएल कोलेस्ट्रॉल कमी करण्यापर्यंत आणि जळजळ कमी करण्यापर्यंत. तुमच्या दैनंदिन जेवणात जास्तीत जास्त फायबरयुक्त पदार्थ समाविष्ट केल्याने तुमच्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्यावर खूप मोठा फरक पडू शकतो. असा फायबरयुक्त आहार म्हणजे हृदयासाठी कवचकुंडलेच ठरतात.

हृदयरोगतज्ज्ञ आणि हृदय-प्रत्यारोपण तज्ज्ञांच्या मते, फायबर केवळ आतड्याच्या आरोग्यासाठी फायदेशीर नाही, तर ते तुमच्या आहारात समाविष्ट केल्याने हृदयाच्या आरोग्यासासाठी लक्षणीयरीत्या लाभकारक ठरू शकते. 'फायबर ही फक्त आतड्याच्या आरोग्यासाठीच नव्हे तर ते प्रत्यक्षात तुमच्या हृदयावरील दबाव कमी करण्याचे कामही करते,' असे ते सांगतात.

हृदय व रक्तवाहिन्याचे आरोग्य चांगले राखण्यात फायबर महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. कारण, अपचनामुळे होणाऱ्या पित्ताच्या त्रासामुळे हृदयावरील दबाव वाढतो. तो ताण कमी करण्यास फायबर मदत करते. ते साखरेचे शोषण कमी करते, इन्सुलिन कमी करते, एलडीएल कमी करते आणि जळजळ कमी करते. आहारात दैनंदिन फायबरचा उपयोग ठेवण्यामुळे नैसर्गिकरित्याच हृदयरोग आटोक्यात ठेवता येतो तसेच वजनही व्यवस्थित राखता येते. हृदयरोगतज्ज्ञ सांगतात, 'जे लोक जास्त फायबरयुक्त खातात त्यांना हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण कमी असते, रक्तदाब स्थिर असतो, कोलेस्ट्रॉल चांगले असते आणि वजन नियंत्रण चांगले असते... तेही कसलीही औषधे न घेता.' त्यामुळे फायबरयुक्त आहाराबाबत सजग राहणं कधीही चांगलंच.

## मलेशियन एअरलाईन्सच्या विमानाचे रहस्य उलगडणार!


आठ वर्षांपूर्वी म्हणजेच २०१४ मध्ये मलेशियन एअरलाईन्सचे एक २३९ प्रवाशांना घेऊन जाणारे विमान अचानक बेपत्ता झाले होते. आजपर्यंत या विमानाचा शोध लागलेला नाही. त्यामुळे या विमानाचे नेमके झाले काय? असा प्रश्न हा अनुत्तरित आहे. मात्र, या प्रश्नाची उकल होणार असून बेपत्ता विमानाचे रहस्य उलगडणार आहे. विमानाच्या इतिहासातील सर्वात मोठे आणि गूढ रहस्य असलेल्या या विमानाचा शोध मलेशिया सरकारने पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली आहे.




८ मार्च २०१४ रोजी क्वालालंपूरहून बीजिंगकडे निघालेले बोईंग ७७७ हे मलेशियन एअरलाईन्सचे विमान उड्डाणानंतर काही तासांतच रडारवरून गायब झाले. त्यानंतर मोठ्या प्रमाणात शोधकार्य होऊनही विमानाचे अवशेष आजतागायत सापडलेले नाहीत. ही घटना आजही विमानन इतिहासातील सर्वात मोठे रहस्य मानली जाते. मलेशियाच्या परिवहन मंत्रालयाने जाहीर केले आहे की, ३० डिसेंबरपासून या विमानाचा शोध पुन्हा सुरू केला जाईल. या दुर्घटनेत प्रभावित झालेल्या कुटुंबीयांना सांत्वना देणे आणि त्यांना उत्तर देणे, ही आमची जबाबदारी आहे, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

नवीन शोधमोहीम त्याच प्रयत्नाचा एक भाग आहे. आंतरराष्ट्रीय समुद्री अन्वेषण संस्था ही शोधमोहीम हाती घेणार आहे. ही कंपनी पूर्वीच्या विश्लेषणांवर आधारित त्या विशिष्ट समुद्री भागात शोध घेईल, जिथे ३७० च्या अवशेषांच्या सापडण्याची सर्वाधिक शक्यता आहे. यावर्षी मार्चमध्येही शोधाला सुरुवात करण्यात आली होती; परंतु हवामान आणि समुद्रातील प्रतिकूल परिस्थितीमुळे काही दिवसांतच ती स्थगित करावी लागली होती. ही घटना आजही जगभरातील तज्ज्ञ आणि वैज्ञानिकांसाठी एक मोठे कोडे आहे. आता पुन्हा सुरू होणां?या या मोहिमेतून काही ठोस पुरावे मिळतील आणि ८ वर्षांहून अधिक काळ असलेले हे गूढ अखेर उकलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती वाढवायचीय?



हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवणाऱ्या पदार्थांचे सेवन लाभदायक ठरत असते. यासाठी तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी सुका मेवा हे सर्वोत्तम स्रोत मानले जातात. मनुका, बदाम, अंजीर आणि खजूर यांसारखा सुका मेवा यासाठी गुणकारी आहे. हे सर्व नट्स त्यांच्या पौष्टिकतेसाठी आणि वेगवेगळ्या फायद्यांसाठी ओळखले जातात. मात्र जेव्हा शरीराला उबदार ठेवण्याचा विचार येतो, तेव्हा बदाम आणि अंजीर हे सर्वोत्तम पर्याय मानले जातात. मात्र काही लोकं हिवाळ्यात रिकाम्या पोटी बदाम की अंजीर खाणे जास्त फायदेशीर आहे, यामध्ये संभ्रमात असतात. आता तज्ज्ञांनी याबाबतची माहिती दिली आहे.

अंजीर हे एक पौष्टिक फळ आहे आणि ते लोहाचा एक उत्कृष्ट स्रोत मानले जाते. त्यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, बी जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्सदेखील असतात. अंजीरमध्ये उष्णता निर्माण करणारा प्रभाव असतो, ज्यामुळे ते हिवाळ्यात खाण्यासाठी सर्वोत्तम बनतात. अशक्तपणाने ग्रस्त असलेल्यांसाठी अंजीर खाणे खूप फायदेशीर ठरू शकते. ते दररोज खाल्ल्याने पचन सुधारते, अशक्तपणा कमी होतो आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत होते. बदाम हे फायबरचा एक उत्तम स्रोत मानले जातात. बदाम दररोज खाल्ल्याने पचनसंस्था मजबूत होण्यास मदत होते. कारण यात निरोगी फॅट, व्हिटॅमिन ई, प्रथिने, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्सदेखील असतात. फायबरमध्ये समृद्ध असल्याने बदाम तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करतात, वारंवार भूक लागणे टाळतात आणि तुमचे वजन नियंत्रित करण्यास मदत करतात.



तज्ज्ञ सांगतात की, बदाम आणि अंजीर हे दोन्ही उष्ण प्रकृतीचे नट्स आहेत. यासाठी ते हिवाळ्यात खाण्यासाठी लाभदायक मानले जातात. मात्र त्यांचे पौष्टिकता मूल्य वेगळेवेगळे आहेत. जसे की, बदाम हे फायबरचे एक उत्तम स्रोत आहेत, तर अंजीरमध्ये भरपूर प्रमाणात लोह असते. बदाम खाल्ल्याने स्मरणशक्ती सुधारते, ऊर्जा वाढते आणि वजन नियंत्रित होण्यास मदत होते. अंजीर अशक्तपणा कमी करण्यास, बद्धकोष्ठता दूर करण्यास आणि श्वसन प्रणाली मजबूत करण्यास देखील मदत करतात. हिवाळ्यातील गरजांनुसार तुम्ही यापैकी कोणताही एक नट्स निवडू शकता.

तज्ज्ञ सांगतात की, जर तुम्हाला सकाळी रिकाम्या पोटी बदाम किंवा अंजीर खायचे असतील, तर ते रात्रभर भिजवून खा. तुम्ही बदाम सोलून संपूर्ण खाऊ शकता. अंजीर कच्चे खाऊ शकता. तुम्ही ४-५ बदाम आणि २ अंजीर खाऊ शकता. सकाळी त्यांचे सेवन केल्याने दिवसभर ऊर्जा टिकून राहते, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि शरीराला उबदारपणा आणि शक्ती मिळते.

# ॲन्युअल हेल्थ इन्श्युरन्स रिव्ह्यू : एक स्मार्ट इन्व्हेस्टमेंट

आपण कितीही काळजीपूर्वक प्लॅन केला तरीही आयुष्यात अनपेक्षित घटनांना सामोरे जावे लागते. अचानक उद्भवलेले आजार, अनपेक्षित अपघात किंवा अगदी नियमित तपासणीतून होणाऱ्या निदानातून मोठ्या आर्थिक खर्चाचा भार पेलावा लागू शकतो. वर्षागणिक वाढणाऱ्या वैद्यकीय खर्चामुळे आता हेल्थ इन्श्युरन्स हे केवळ एक सुरक्षा कवच नसून महत्त्वाची गरज बनली आहे. आयुष्य हे नेहमी नवनवीन घडामोडींनी भरलेले असते. घरात छोट्या पाहुण्यांचे आगमन असो की वृद्ध पालकांची काळजी किंवा आयुष्यात नव-नवीन टप्पे गाठणे अशा आयुष्यात घडणाऱ्या स्थित्यंतरांबरोबर तुमचे इन्श्युरन्स कव्हरेजही अपडेट असणेही तितकेच महत्वाचे ठरते. म्हणूनच, दरवर्षी तुमची पॉलिसी रिव्ह्यू करणे खूप गरजेचे आहे; जेणेकरून वाढत्या वयासोबत आणि बदलत्या परिस्थितीनुसार तुम्हाला संपूर्ण संरक्षण मिळत राहील.

## हेल्थ इन्श्युरन्सचा वार्षिक रिव्ह्यू का महत्वाचा? जाणून घ्या :

**जशी जीवनशैली, तसा प्लॅन :** ज्याप्रमाणे तुमच्या जीवनशैलीत बदल होतो, त्याचप्रमाणे तुमच्या हेल्थ इन्श्युरन्सची आवश्यकता बदलत असते. तणावाची पातळी, खाण्यापिण्याच्या सवयी, कामाच्या ठिकाणी असणारे वातावरण, प्रवासाची फ्रिक्वेन्सी आणि वय या सर्व गोष्टींचा तुमच्या आरोग्यावर थेट परिणाम होतो. जसे की, नियमित प्रवास करणाऱ्या व्यक्तींना आंतरराष्ट्रीय वैद्यकीय खर्चास कव्हरेज गरजेचे असू शकते, तर जास्त मानसिक तणावाचे काम करणाऱ्या व्यक्तीला मधुमेह किंवा रक्तदाबासारख्या आजारांसाठी मोठ्या कव्हरेजची गरज भासू शकते. दरवर्षी तुमच्या प्लॅनची तपासणी केल्यामुळे तुमचे कव्हरेज परिस्थितीनुसार बदलत राहते आणि भविष्यातील वाढत्या वैद्यकीय खर्चासाठी तुम्हाला एक परिपूर्ण आर्थिक संरक्षण मिळते.

**नवीन प्रॉडक्ट्स आणि वैशिष्ट्यांबद्दल माहिती :** भारतातील हेल्थ इन्श्युरन्स मार्केट वेगाने बदलत आहे. जिथे कंपन्या नेहमीच नवीन प्लॅन्स आणत असतात किंवा जुन्या प्लॅन्समध्ये सुधारणा करत असतात. या सुधारणांमुळे तुम्हाला जास्त कव्हरेज, कमीत कमी वेटिंग पिरियड किंवा वेलनेस प्रोग्राम आणि मोफत आरोग्य तपासणी सारख्या अतिरिक्त सुविधा मिळू शकतात. जर तुम्ही तुमच्या प्लॅनचा वेळोवेळी रिव्ह्यू केला नाही, तर या नवीन सुविधा आणि त्याचे फायदे तुम्हाला मिळणार नाहीत. अपडेट राहिल्यामुळे, तुम्ही तुमच्या सध्याच्या प्लॅनची नवीन पर्यायांसोबत तुलना करू शकता आणि प्लॅन बदलल्याने तुम्हाला अधिकाधिक लाभ आणि चांगले संरक्षण मिळण्याची खातरजमा करु शकता.

**संचयी बोनसचा (CB) लाभ :** तुम्ही क्लेम न केलेल्या प्रत्येक वर्षासाठी बहुतेक कंपन्या तुम्हाला संचयी बोनस देतात. हा बोनस दरवर्षी १०% ते १००% पर्यंत असू शकतो आणि हा फायदा एकतर तुमची कव्हरेज रक्कम वाढवून किंवा तुमचा प्रीमियम कमी करून दिला जातो. समजा, तुमच्या पॉलिसीची एकूण इन्श्युरन्स रक्कम ₹५ लाख आहे. आता २०% संचयी बोनस मिळाल्यामुळे, कोणताही एक्स्ट्रा खर्च न करता ही रक्कम थेट ₹६ लाखांपर्यंत वाढू शकते. मात्र, जर तुम्ही तुमच्या पॉलिसीची नियमित रिव्ह्यू केला नाही, तर तुम्हाला या फायद्यांचा पूर्ण लाभ घेता येणार नाही आणि गरज नसताना जास्त पैसे भरावे लागू शकतात. वार्षिक रिव्ह्यू केल्यामुळे तुम्हाला तुमचे NCB योग्यप्रकारे ट्रॅक करण्यासाठी आणि वापरण्यासाठी मदत होते.

**पूर्व-विद्यामान आजारांसाठी कव्हरेज :** जर तुम्हाला पूर्वीपासूनच मोतिबिंदू, मधुमेह किंवा हृदयविकार यांसारखे आजार असतील, तर हेल्थ इन्श्युरन्समध्ये त्यांच्या कव्हरेजसाठी तुम्हाला काही काळ वाट पहावी लागू शकते. हा वेटिंग पिरियड वेगवेगळ्या इन्श्युरन्स कंपन्यांनुसार वेगळा असू शकतो. दरवर्षी आपला प्लॅन तपासून पाहिल्यास, याच आजारांसाठी कमी वेटिंग पिरियड किंवा चांगल्या अटी देणारी दुसरी कंपनी शोधणे सोपे होते. उदाहरणार्थ, तुमच्या चालू प्लॅनमध्ये मोतिबिंदूच्या शस्त्रक्रियेसाठी दोन वर्षांची वाट पाहावी लागत असेल आणि दुसरा प्लॅन तेवढ्याच प्रीमियममध्ये एका वर्षात कव्हरेज देत असेल, तर नवीन प्लॅन घेणे तुमच्यासाठी फायद्याचे ठरेल. नियमितपणे प्लॅनची तपासणी केल्यामुळे, चालू कंपनीसोबतच राहायचे की दुसरा आणखी चांगला पर्याय निवडायचा हे ठरवणे सोपे जाते.

**वाढत्या वैद्यकीय खर्चाशी सुसंगतता :** भारतामध्ये वैद्यकीय खर्च झपाट्याने वाढत आहेत, विशेषतः कॅन्सर, हृदयविकार किंवा अवयव प्रत्यारोपणासारख्या गंभीर आजारांवरील उपचाराचा खर्च हा काही लाख रुपयांमध्ये असतो. एकीकडे वैद्यकीय खर्च वाढत असतानाही जर तुमच्या कव्हरेजची रक्कम तेवढीच राहिली तर तुम्हाला असा मोठा खर्च स्वतः करावा लागेल. ज्यामुळे तुमचे आर्थिक बजेट कोलमडू शकते. तुमच्या प्लॅनची वार्षिक तपासणी केल्यामुळे तुम्हाला तुमची इन्श्युरन्स रक्कम वाढवण्याची किंवा गंभीर आजारांसाठीचे कव्हर यांसारखे अतिरिक्त फायदे समाविष्ट करण्याची संधी मिळते. जेणेकरुन भविष्यातील वैद्यकीय खर्चासाठी तुमची पॉलिसी परिपूर्ण ठरेल आणि अपडेटेड राहील. न्युअल हेल्थ इन्श्युरन्स रिव्ह्यू ही केवळ एक औपचारिकता नसून बदलत्या जीवनशैलीनुसार तुमचे कव्हरेज अपडेट ठेवण्याचा हा एक सोपा मार्ग आहे. तुम्ही खरेदी केली आणि विसरला अशी हेल्थ इन्श्युरन्स ही बाब नव्हे; हे तुमच्या आर्थिक आणि वैयक्तिक हिताचे रक्षण करणारे एक महत्त्वाचे संरक्षण कवच आहे. दरवर्षी प्लॅन रिव्ह्यू केल्यामुळे आयुष्यातील मोठे बदल, वाढते वैद्यकीय खर्च आणि नवीन हेल्थकेअर सुविधा यानुसार तुमची पॉलिसी नेहमी अपडेट राहते. एका सोप्या सवयीमुळे तुमच्या कुटुंबाचे संरक्षण, कव्हरेजची व्हॅल्यू वाढते आणि आकस्मिक संकटासाठी तयार राहता येते. थोडक्यात सांगायचे तर, ॲन्युअल रिव्ह्यू करणे ही केवळ एक चांगली सवय नसून तुमच्या गरजेनुसार इन्श्युरन्स नेहमी अपडेट आणि खात्रीशीर ठेवण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे.

**– अमरनाथ सक्सेना**
(चीफ टेक्निकल ऑफिसर –कमर्शियल)
बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड
(पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड)

# नौजवान भारत सभा आयोजित सात दिवसीय विद्यार्थी सर्जनशीलता शिबिराचा समारोप


नौजवान भारत सभा आयोजित सर्जनशिलता शिबिरात चित्रकलेचे धडे गिरवताना विद्यार्थी.

नगर – नौजवान भारत सभा, अहिल्यानगर यांच्या वतीने महाराष्ट्र बालक मंदिर सिद्धार्थनगर येथे आयोजित करण्यात आलेले सात दिवसीय विद्यार्थी सर्जनशीलता शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. २६ मे ते १ जून या कालावधीत आयोजित या शिबिरात एकूण ११५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

कामगार, कष्टकरी आणि वंचित समाजघटकांतील विद्यार्थ्यांना कला, विज्ञान, सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार, सर्जनशीलता, आत्मविश्वास, सामाजिक जाणीव आणि परिवर्तनवादी मूल्यांची जडणघडण घडवून आणण्यावर शिबिरात विशेष भर देण्यात आला.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी दिपक रोकडे, सीए धुप्पड आणि ज्येष्ठ नागरिक दिनकर साळवे हे पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबिराच्या पहिल्या दिवशी रंगसंगती आणि गणितावरील रंजक उपक्रम घेण्यात आले. रंगांचे महत्त्व, सौंदर्यदृष्टी आणि सर्जनशील अभिव्यक्ती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच खेळ अंकांचा या उपक्रमातून गणितातील तर्कशक्ती आणि निरीक्षणक्षमतेचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून रवींद्र सातपुते उपस्थित होते. याच दिवशी शिल्पकार विकास कांबळे यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून शिल्पनिर्मितीचे प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने विविध शिल्पकृती तयार करत आपल्या कल्पनाशक्तीला आकार दिला.

तिसऱ्या दिवशी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सापा सर यांनी अंधश्रद्धाविरोधी प्रयोग सादर केले. तसेच रजत सर यांनी ध्वनिशास्त्रावरील विविध प्रयोगांद्वारे विद्यार्थ्यांना विज्ञानाची मूलभूत तत्त्वे प्रत्यक्ष अनुभवातून समजावून सांगितली. विज्ञानाकडे जिज्ञासू आणि चिकित्सक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा या सत्रातून विद्यार्थ्यांना मिळाली. चौथ्या दिवशी विविध सामूहिक खेळांचे आयोजन करण्यात आले. यामधून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, सहकार्य, नेतृत्व आणि आत्मविश्वास विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर शिवाजी नायकवडे सर यांनी गुड टच – बॅड टच या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण केली. पाचव्या दिवशी समारोप कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांकडून नृत्य, नाट्य, गाणी आणि वादनाची रंगीत तालीम घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपली कलात्मक तयारी सादर केली. सहाव्या दिवशी आयोजित समारोप व सांस्कृतिक कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान निवृत्त संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य व सामाजिक कार्यकर्ते प्रा. सुभाष कडलक यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून नौजवान भारत सभा महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य राहुल साबळे उपस्थित होते. तसेच नौजवान भारत सभा अहिल्यानगर टीमचे समन्वयक अतुल महारनवर यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गाणी, वादन, कराटे प्रात्यक्षिके आणि सामाजिक आशयाच्या नाटिका सादर केल्या. मोबाईलचा कैदी या नाटिकेद्वारे मोबाईल व्यसनाचे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शिबिराचा शेवटचा दिवस साईबान कृषी पर्यटन केंद्राच्या शैक्षणिक सहलीने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी बटरफ्लाय गार्डन, वॉटर बोटिंग, जैवविविधता निरीक्षण तसेच जलपुनर्वापर प्रकल्पाची माहिती घेत पर्यावरण आणि विज्ञान यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कला, विज्ञान, निसर्ग, सामाजिक जाणीव, स्वसंरक्षण आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचे बहुआयामी अनुभव मिळाले. अनुभवाधारित शिक्षण, सामूहिक सहभाग आणि सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सहकार्यभावना आणि नेतृत्वगुण विकसित झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारचे उपक्रम अत्यंत आवश्यक असून भविष्यातही अशा शिबिरांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल, अशी माहिती नौजवान भारत सभेच्या वतीने अहिल्यानगर शहर समन्वयक अतुल महारनवर यांच्या वतीने देण्यात आली.


रेणावीकर विद्यालयातील ९०% पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा विद्यालयात शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. राजीव हाजीरनीस यांच्या हस्ते झाला.

# रेणावीकर विद्यालयाचे दुहेरी यश, गुणवंतांचा सत्कार

## विद्यार्थिनी संपूर्ण जिल्ह्यात प्रथम तर संस्कृतमध्ये १०० पैकी १०० मार्क्स असणाऱ्या ५ विद्यार्थी

नगर – सावेडीतील रेणावीकर माध्यमिक विद्यालयाने माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२६ मध्ये यंदा दुहेरी यश संपादन केले आहे. विद्यालयाची विद्यार्थिनी गौरी मुकेश साठे ही तब्बल ५०० पैकी ४९८ गुण संपादन करून जिल्ह्यात प्रथम स्थानावर आली आहे. विद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा विशेष करून ९०% पेक्षा जास्त गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा विद्यालयात शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. राजीव हाजीरनीस यांच्या हस्ते झाला.

याप्रसंगी विद्यालयात सत्कारमूर्ती विद्यार्थी–विद्यार्थिनी, त्यांचे पालक, अध्यापक त्याचप्रमाणे प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, मुख्याध्यापक चंदू गवळी, शाला समितीचे महामात्र डॉ. उमेश बिबवे, सदस्य पिंपळे व विद्यार्थी उपस्थित होते.

गौरी मुकेश साठे ९९.६० प्रथम क्रमांक, राघव शिरीष व्हरसाळे ९८.८० द्वितीय क्रमांक तर सिद्ध आशिष चाकवते ९६.६० गुण प्राप्त करून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. विद्यालयातील ५ विद्यार्थ्यांना संस्कृतमध्ये १०० पैकी १०० गुण प्राप्त झाले आहेत.

याप्रसंगी डॉ. हजिरनीस सर यांनी विद्यार्थ्यांना करिअर घडवताना वेळोवेळी SWOT तंत्राचा वापर करण्याचा मुलाचा सल्ला दिला. गौरी साठे या विद्यार्थिनींनी विद्यालयाचे नाव शहराच्या शैक्षणिक इतिहासात उंचावले यासाठी तिचे विशेष कौतुक करून तिला रोख बक्षीस प्रदान करून शाब्बासकी दिली.

यंदाच्या वर्षी विद्यालयाची विद्यार्थिनी संपूर्ण जिल्ह्यात प्रथम आली आहे तसेच संस्कृत मध्ये १०० पैकी १०० मार्क्स असणाऱ्या पाच विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे – नम्रता घोलप, ज्ञानेश्वरी बारस्कर, गौरी ढवण, राघव व्हरसाळे, सिद्धा चाकवते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्नेहल उपाध्ये यांनी केले. शैलेश बोरुडे यांनी आभार मानले.


कवयित्री रचना यांना उत्कृष्ट साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# कवयित्री रचना यांचा पसायदान पुरस्काराने गौरव

नगर – रत्नागिरी (गुहागर) जिल्ह्यातील पसायदान प्रतिष्ठान आणि दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार कवयित्री रचना यांना ज्येष्ठ साहित्यिक प्रमोद कोपर्डे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या सोहळ्यात लेखिका रचना यांच्या पुष्पऋचा या कवितासंग्रहाला पसायदान उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे, शिरीष चिटणीस, पसायदान प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब लबडे, ज्येष्ठ कवी माधव रोकडे आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे साहित्यिक डॉ. संजय बोरुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लेखिका रचना यांचा पुष्पऋचा हा जरी पहिलाच कवितासंग्रह असला, तरी त्यांनी यापूर्वी कादंबरी, कथासंग्रह, समीक्षा ग्रंथ, तसेच अनुवादित कथा आणि कवितासंग्रहांच्या माध्यमातून साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या साहित्याला आजवर अनेक मानसन्मान मिळाले असून, अलीकडेच त्यांचा द स्वॅलोज हा अनुवादित कवितासंग्रह रोमानियातील झलाऊ येथे प्रकाशित झाला आहे.

यापूर्वी पुष्पऋचाला शांताबाई शेळके पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे. पसायदान प्रतिष्ठानच्यावतीने यंदा उत्कृष्ट कादंबरी, कथासंग्रह आणि कवितासंग्रह अशा विविध श्रेणींत पाच साहित्यिकांना गौरविण्यात आले. सोहळ्याची सुरुवात बाळासाहेब लबडे यांच्या बुटक्याचे बेट या कादंबरीच्या प्रकाशनाने झाली. त्यानंतर लबडे यांनी पुरस्कारप्राप्त साहित्यकृतींचे विवेचन केले. चंद्रकांत बाबर (यास्मिन आणि इतर दीर्घकविता) आणि सोनिया पाटील (थिजलेल्या माणुसकीचा गहिवर), डॉ. नागनाथ कोत्तापल्ले उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार डॉ. दिवाकर कृष्ण आचार्य यांना तर भारत सासणे उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार डॉ. अनंता सूर यांना प्रदान करण्यात आला.

# विजय बळीद यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

## ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटीत सेवाभावी कार्याचा गौरव; मतीमंद मुलांवर 'लहान पावले उज्ज्वल भविष्य' पुस्तकाचे प्रकाशन


मतिमंद विकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर यांच्या हस्ते विजय बळीद व सौ. वर्षा बळीद यांचा सपत्नीक मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

नगर – मतिमंद विकास शिक्षण मंडळ संचलित ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटी कार्यशाळेतील कनिष्ठ लिपिक विजय मानाजी बळीद यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळात संस्थेच्या प्रगतीसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात मतिमंद मुलांच्या शाळेतील वाचा उपचार तज्ज्ञ विक्रम उंडे लिखित 'लहान पावले उज्ज्वल भविष्य' या पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात करण्यात आले.

मतिमंद विकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर यांच्या हस्ते विजय बळीद व सौ. वर्षा बळीद यांचा सपत्नीक मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या प्रामाणिक, निष्ठावंत व सेवाभावी कार्याचा गौरव उपस्थितांनी केला. संस्थेच्या उभारणीसाठी आणि विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान मोलाचे असून त्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळेल, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या.

तसेच डॉ. साताळकर यांच्या हस्ते विक्रम उंडे लिखित 'लहान पावले उज्ज्वल भविष्य' या पुस्तकाचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमास मतिमंद विकास शिक्षण मंडळाचे सचिव पी. डी. कुलकर्णी, ज्येष्ठ सदस्य अविनाश कुलकर्णी, सदस्य मकरंद खंडागळे तसेच कार्यशाळेचे इन्चार्ज भाऊसाहेब कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मतिमंद मुलांची शाळा, पाथर्डी यांच्या अध्यक्षा अनिता निराळी, मुख्याध्यापक विजय आरोटे, दिलीप जगधने, अतुल भंडारे, चांगदेव खेमनर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान पी. डी. कुलकर्णी, अविनाश कुलकर्णी, मकरंद खंडागळे, सुधीर रणदिवे, रूपाली भिसे आदींनी आपले विचार व्यक्त केले.

डॉ. रवींद्र साताळकर म्हणाले की, विजय बळीद यांनी आपल्या सेवाकाळात जबाबदारीने काम केले. कोणत्याही संस्थेची प्रगती केवळ इमारतींमुळे होत नाही, तर त्या संस्थेत कार्य करणाऱ्या समर्पित कर्मचाऱ्यांमुळे होत असते. बळीद यांचे योगदान हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

विक्रम उंडे यांनी लिहिलेले 'लहान पावले उज्ज्वल भविष्य' हे पुस्तक केवळ पुस्तक नसून विशेष मुलांच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या पालक, शिक्षक आणि समाजासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. विशेष मुलांना समजून घेण्यासाठी संवेदनशीलता, संयम आणि योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. हे पुस्तक त्या दिशेने महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लेखक विक्रम उंडे यांचे बौद्धिक अक्षम मोठे बंधू सुधीर उंडे, वडील राजाराम उंडे, आई हिराबाई उंडे तसेच उंडे कुटुंबातील नातेवाईक उपस्थित होते.

प्रास्ताविक कार्यशाळेचे इन्चार्ज भाऊसाहेब कदम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवी कुटे यांनी केले. विक्रम उंडे यांनी आभार मानले.

# जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनतर्फे करियर, रोजगार आणि स्वयंरोजगाराची सुवर्ण संधी

जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनव्दारा रोजगार स्वयंरोजगारच्या सुवर्णसंधी देणारे विविध मेडिकल, नर्सिंग, पॅरामेडिकल तांत्रिक आणि व्होकेशनल (व्यवसायिक) कोर्से स संस्थेतुन चालविले जातात. ही संस्था भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालय, तसेच महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ मुंबई व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेशी मान्यताप्राप्त संलग्न आहे.

मानवी जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी आरोग्याबरोबरच ज्ञानाची जोड असली पाहीजे. जीवनज्योत मेडिकल फाउंडेशन हि संस्था शैक्षणिक, सामाजिक, व्यवसायिक आणि वैदयकिय शोध संस्था आहे. हि संस्था वैदयकिय सुविधा, शिक्षण, जनजागृतीसाठी उदयास आलेली आहे. तसेच स्वयंरोजगाराच्या संधी आणि मानवी राहणीमान उंचावण्यासाठी या संस्थेतून मिळू शकते

वनविभाग ऑफीसमागे, नगर औरंगाबादरोड, अहमदनगर येथील बॉम्बे नर्सिंग होम इमारतीमध्ये कार्यालय आहे. मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा हे ध्येय ठेवुन सन १९९४ साली संस्थेची स्थापना झाली. तीन मजली सुसज्ज इमारतीमध्ये अत्याधुनिक शिक्षण पध्दतीव्दारे तज्ञ मार्गदर्शन वर्ग या संस्थेमध्ये उच्च विभूषित तसेच नावाजलेल्या व्यक्तींचा स्टाफ त्यामध्ये डॉक्टर्स, नर्सेस, समुपदेशक, पॅथॉलोजिस्ट, तसेच शिक्षकांचा समावेश आहे. संस्थेमार्फत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाची या पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे १००% नोकरीची संधी उपलब्ध आहे.

दहावी / बारावी व पदवीधर पास नापास मुलामुलींसाठी विविध कोर्सेस येथे चालवले जातात. दोन / एक वर्षात स्वकर्तृत्वावर उभे राहण्याची संधी व शासकीय नोकरीची पात्रता व संधी असलेले कोर्सेस येथे उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच पमाणपत्र दिले जातात. प्रमाणपत्राची नोंद सेवा योजना कार्यालयास व रोजगार कार्यालय (एम्प्लॉयमेंट) मध्ये होते.

पॅरामेडिकल कोर्सेस, नर्सिंग क्षेत्रामधे ऑपरेशन थिएटर टेक्निशियन, नर्सिंग केअर, तसेच डिप्लोमा कोर्स इन फिजिओथेरापी, मेडिकल लॅब टेक्निशियन, रेडीओलॉजी टेक्निशियन, (एक्स रे / इ.सी.जी /सिटी स्कॅन / एम.आर.आय/सोनोग्राफी/ कॅथलॅब) डायलॅसिस, हेल्थ अ‍ॅन्ड सॅनिटरी इन्सपेक्टर, ऑप्टोमेट्री, ऑप्टीशियन (चष्म्याचे नंबर काढणे, चष्मे, काचा व फ्रेम बनविणे, कॉन्टॅक्ट लेन्सची माहीती व बसविणे) डेंटल मेकॅनिक टेक्निशियन (कृत्रिम दात व कवळी बनविणे, दुरुस्ती करणे), डेंटल हायजिनिस्ट टेक. (तोंडाच्या आजाराची माहिती व तोंडाची देखरेख करणे), डेंटल असिस्टंट व डायटीशन असिस्टंट इत्यादी कोर्सेसचा समावेश आहे.

व्यवसायिक /तांत्रिक कोर्सेसमध्ये ब्युटीपार्लर अँड हेअर ड्रेसिंग, फायर अँड सेफ्टी मॅनेजमेट, बांधकाम पर्यवेक्षक – स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (आय.टी.आय. समकक्ष), कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी व प्री प्रायमरी टिचर्स (बालवाडी / अंगणवाडी शिक्षिका) कोर्सेस चालविले जातात.

हे कोर्स उत्तीर्ण झाल्यावर विदयार्थ्यांना स्वत:चा व्यवसाय करता येतो. शासकिय व खाजगी नोकरीची संधी. बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) कोर्स उत्तीर्ण झाल्यावर जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, बी अ‍ॅण्ड सी व इतर विभागात शासकीय नोकरीची संधी उपलब्ध असुन पगार रु. ९३००–३४८०० ग्रेड पे रुपये ५६०० अशा प्रमाणात नेमणूक प्रक्रिया केली जाते. अशी माहीती प्राचार्यांनी दिली. अधिक माहीतीसाठी बॉम्बे नर्सिंग होम बिल्डींग, वनविभाग कार्यालयामागे, अहमदनगर येथे संपर्क साधावा. मो. ८८३०६८५७३२

उपरोक्त पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी.

Online admission साठी www.jjmf.info वर भेट दया....

संस्थेत पॅरामेडिकल शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सुसज्ज हॉस्पीटलमध्ये प्रत्यक्ष सराव करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. संस्थेत शिक्षण घेतलेले अनेक विदयाथी आज मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर येथील मोठ्या हॉस्पीटलमध्ये कार्यरत असल्याचे संचालकांनी सांगितले.

सध्या वैदयकिय व्यवसाय व आधुनिक तंत्रज्ञानामुळे पॅरामेडीकल (अर्धवैदयकिय) व व्यावसायिक / तांत्रिक क्षेत्रात स्टाफची मागणी वाढलेली आहे. जीवन ज्योत ही संस्था शासन मान्यता प्राप्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊन त्यांचे राहणीमान उंचावले आहे.

विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयीयुक्त सुसज्ज असे मुलींचे स्वतंत्र वसतीगृह आहे. लॅबरेटरी अत्याधुनिक उपकरणांसह संलग्न हॉस्पीटल वर्कशॉप, लॅबरेटरी, ऑडीओ – व्हिडीओ लायब्ररी, कॉम्प्युटर / प्रोजेक्टरव्दारा प्रशिक्षण, मेस, एस. टी व रेल्वे पासची सुविधा, मोफत इंग्लिश स्पिकिंग व बेसिक कॉम्प्यूटर कोर्स, माफक शुल्क, हप्त्याने फी भरण्याची सोय, एज्युकेशन लोनची सुविधाचे मार्गदर्शन में सहारुयता यासह रोजगार उपलब्धतेसाठी मार्गदर्शन व सहाय्यता विद्यार्थ्याना केली जाते.

# वैवाहिक जोडप्यांच्या समस्या आणि समुपदेशन

**विवाह :** विवाह म्हणजे कायद्याने किंवा अधिकृतपणे दोन व्यक्ती एकत्र येण्याची दिलेली मान्यता **विवाह संख्या :** विवाहसंस्था ही एक पवित्र असून जे परमेश्वराने जोडले ते कोणी माणसाने तोडु नये तर त्यांनी एकत्रित राहावे आनंदात जिवन जगावे परंतु आजच्या आधुनिक काळात वैवाहिक समस्या दिसून येतात. पती व पत्नी यांच्या मधील नातेसंबंध अधिक बळकट करण्यासाठी तसेच त्यांच्यातील गैरसमज दूर करणे आणि वैवाहिक समस्या सोडवण्यासाठी, आपसातील सुसंवाद अधिक मजबुत करण्यासाठी आणि वैवाहिक समस्या सोडवण्यासाठी जे मार्गदर्शन व सल्ला मसलत केली जाणारी प्रक्रिया म्हणजेच वैवाहिक समुपदेशन होय.

देवाने एक पुरुष आणि एक स्त्री यांच्यातील अत्यंत जिव्हाळ्याचे नाते म्हणून रचलेला एक पवित्र, आजीवन करार असे केले आहे. तो सहवास, कुटुंब प्रेमाचे प्रतिबिंब यासाठी पाया म्हणून काम करतो. **एकदेह' मिलन :** विवाह हा केवळ एका कायदेशीर कराराच्या पलीकडचा आहे; ते एक गहन शारीरिक, भावनिक आणि आध्यात्मिक बंधन आहे, जिथे जोडपे एकसंध बनते. म्हणून पुरुष आपल्या आई-वडिलांना सोडून आपल्या पत्नीला चिकटून राहील आणि ते दोघे एकदेह होतील. स्थायित्व: देवाने स्थापित केल्यामुळे, विवाह हे एक कायमस्वरूपी, आयुष्यभराचे बंधन मानले जाते. म्हणून ते दोघे नाहीत, तर एकदेह आहेत. म्हणून देवाने जे एकत्र जोडले आहे, ते कोणीही वेगळे करू नये. परस्पर त्याग आणि आदर: ज्यात पतींना आपल्या पत्नींवर त्यागपूर्वक प्रेम करण्यास आणि पत्नींना आपल्या पतींचा आदर करण्यास सांगितले आहे. **निष्ठा आणि सन्मान :** लैंगिक पावित्र्य आणि निष्ठा यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे, तसेच वैवाहिक शय्या सन्मानित व पवित्र ठेवली पाहिजे. सर्वांनी विवाहाचा आदर करावा आणि वैवाहिक शय्या पवित्र ठेवावी.

**विवाहाचा उद्देश : सोबती :** मानवी एकाकीपणा कमी करण्यासाठी आणि आधार देणारी भागीदारी प्रदान करण्यासाठी. **संतती :** फलदायी होणे, वंशवृद्धी करणे. **आध्यात्मिक वाढ :** वैयक्तिक पावित्र्यासाठी एक साधन म्हणून काम करणे, ज्यासाठी सखोल क्षमा, संयम आणि करुणा आवश्यक आहे.

विवाह समुपदेशन का आवश्यक आहे Marriage Counseling इतकं महत्त्वाचं का? Happy Marriage साठी लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाचा टप्पा असतो. त्यामुळे जोडप्यांना एकमेकांना चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी तसेच वैवाहिक जीवन सुरळीत राहण्यासाठ वारंवार होणारे वाद किंवा गैरसमज, भावनिक अंतर किंवा संवादातील कमतरता, आर्थिक, कौटुंबिक किंवा सामाजिक दडपणामुळे तणाव, लैंगिक जीवनात अडचणी किंवा मतभेद. समुपदेशन (काउन्सिलिंग) नंतर वैवाहिक आयुष्य यशस्वी करण्यासाठी संवाद, एकमेकांचा आदर आणि सहनशीलता या त्रिसूत्रीचा वापर करणे गरजेचे आहे. समुपदेशकाने दिलेल्या टिप्स अमलात आणल्यास नात्यात पुन्हा गोडवा येऊ शकतो. वैवाहिक आयुष्यात छोट्या-मोठ्या गोष्टींवरून मतभेद किंवा संवाद नसणे (communication gap) यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. समुपदेशनामुळे या समस्यांची मुळे समजून घेऊन योग्य तो मार्ग काढता येतो. **भावना समजून घेणे :** एकमेकांच्या गरजा आणि भावनांचा आदर करणे शिकवले जाते. **वाद निवारण :** भांडणे न करता समस्येवर सकारात्मक मार्ग कसा काढायचा, याचे प्रशिक्षण मिळते. **सहानुभूती वाढवणे :** जोडीदाराच्या दृष्टिकोनातून विचार करण्याची सवय लागते. २. नाते यशस्वी करण्यासाठी उपाययोजना पूर्ण झाल्यानंतर वैवाहिक जीवन सुरळीत ठेवण्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक असतात : **मोकळा संवाद** (Open Communication) : जोडीदाराशी दिवसातून काही वेळ मोकळेपणाने बोला. एकमेकांच्या समस्या शांतपणे ऐकून घ्या. **अपेक्षांवर नियंत्रण :** एकमेकांकडून असणाऱ्या अवास्तव अपेक्षा कमी करा. नाते हे तडजोड आणि विश्वासावर टिकते. व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून एकमेकांसोबत फिरायला जा किंवा आवडत्या गोष्टी एकत्र करा. **माफ करण्याची वृत्ती :** छोट्या-मोठ्या चुकांकडे दुर्लक्ष करून नात्याला पुढे नेणे गरजेचे असते.

**वैवाहिक समुपदेशन व फायदे :-** १ भांडणे व गैरसमज दूर करणे :- आपसातील गैरसमज, द्वेष, राग, मी पणा दूर करणे. दोघांमधील भावना व प्रेम यांची जाणीव करून देणे २. आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडणे तसेच एकमेंकाचा आदर देणे व कौंटुबिक कामात एकमेकांना मदत करणे ३. वैवाहिक जिवनात पारदर्शकता असणे आवश्यक तसेच एकमेंकावर विश्वास ठेवणे आवश्यक असते. ४. एकमेंकात सुसंवाद वाढवणे व घरात सलोख्याचे वातावरण निर्माण ठेवणे नाल्यात गोडवा निर्माण करणे ५. समुपदेशनामुळे (Marriage Counseling) विवाहातील गैरसमज आणि वाद दूर होतात. तज्ज्ञ व्यक्ती जोडप्यांना एकमेकांच्या भावना समजून घेण्यास, संवादाची नवीन कौशल्ये शिकण्यास आणि तणावमुक्त नाते निर्माण करण्यास मदत करतात, ज्यामुळे वैवाहिक जीवन पुन्हा आनंदी आणि यशस्वी होऊ शकते.समुपदेशनानंतर यशस्वी वैवाहिक जीवनासाठी वरिल मुद्द्यांचा प्रामुख्याने समावेश असतो २. समुपदेशनानंतर यशस्वी संसारासाठी टिप्समोकळा संवाद (Open Communication) : मनातल्या गोष्टी न लपवता जोडीदाराशी शांतपणे बोला. एकमेकांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा. अहंकार दूर ठेवा 'मी बरोबर आणि तू चूक' हा वाद थांबवून, नात्याला महत्त्व द्या. चुका मान्य करण्यास शिका.एकमेकांना वेळ द्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून एकत्र फिरायला जा किंवा एकमेकांच्या आवडीच्या गोष्टी करा.मागील गोष्टी विसरून जा (Forgive and Forget): ३. समुपदेशनानंतर जुन्या चुका किंवा वाद पुन्हा-पुन्हा काढणे टाळा. नवीन सुरुवातीवर भर द्या. मर्यादांचे पालन करा. नात्यात आदर कायम राखून एकमेकांच्या वैयक्तिक मतांचा सन्मान करा. नवरा बायकोमधील भांडणं संपून मॅरिड लाईफमध्ये प्रेम, रोमांस वाढावा म्हणून प्रेम- अनेक वेळा वाद निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे संवादाचा अभाव. जर पती-पत्नी एकमेकांचे म्हणणे नीट ऐकून घेत असतील, **तर समुपदेशनाचे टप्पे :-** तणाव कमी करणे: सुरुवातीला दोघांमधील राग आणि तणाव कमी करण्यावर भर दिला जातो.समस्या ओळखणे: वाद होण्याची खरी कारणे शोधली जातात. **सोल्युशन प्लॅन :** नाते सुधारण्यासाठी समुपदेशक जोडप्याला काही मार्ग आणि दिशा देतात ज्याचा दैनंदिन जीवनात फायदा होतो. त्यांना वाद टाळणे सोपे जाते.

**आधुनिक विवाह पद्धती : निवड :** पूर्वी घरातील मोठे व्यक्ती आपल्या मुलांचे विवाह ठरवत असे व त्यांच्या इच्छेप्रमाणे विवाह होत असे त्यामुळे ते जबाबदारी घेऊन त्यांचे त्या विवाहीत जोडप्याकडे लक्ष असे त्याकरिता त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असे. तरुण त्यांच्या लग्नासाठी स्वत निवड करत आहेत पसंती :- आजच्या आधुनिक परिस्थित मुले व मुली स्वतःची पसंती आई वडिलांना सांगतात घरचे देखील त्यांच्या विनंतीत मान देउन त्यांचे लग्न लावून देतात केवळ शारिरिक आकर्षण, पैसा बघुन ते एकमेका कडे आकर्षित होतात व विवाह करतात.

**स्वभाव व एकमेकांना लग्नाअगोदर ओळख :-** जुनी ओळख, स्वभाव तसेच चारित्र्य गुण इतर गोष्टी पहिल्यापासून माहित असल्यास नंतरच्या काळात दोघांमध्ये एकमेंकाचा आदर, सन्मान कमी पहावयास मिळतो त्यामुळे घरात भांडणे व चिडचिड होत असते त्यामुळे दोंघामध्ये दुरावा निर्माण होतो.

**विलंबित विवाह :** शिक्षण व जॉब मिळाव्यात जास्त उशिर झाल्याने कदाचित योग्य अशा समयी लग्न उशिरा होते पाहिजे तसा साथीदार वेळीच न मिळाल्याने वैवाहिक जिवनात समस्या उद्भवतात.

**आर्थिक ताण तणाव :-** वैवाहिक जिवनात आर्थिक परिस्थिती जरा बिकट असेल तर घरात अडीअडचणी, कौंटुबिक गरजा पूर्ण न होणे यामुळे घरात भांडणे होतात नैराश्यमुळे मनात वेगळे नकारात्मक विचार येणे व मनुष्य व्यसनाच्या आहारी जातात.

**विभक्त कुंटूब पद्धती :** कामानिमित गावाबाहेर नौकरी करणे तसेच नवरा व बायको हे दुसऱ्या गावी राहतात त्यामुळे संस्कुती, शिस्त, कुंटूब व्यवस्थापन यांचे धडे मोठ्या व्यक्तींकडून न मिळाल्याने घरात कोणाचे कोणावर नियंत्रण राहत नाही दोघेही जॉब करतात घरापेक्षा जास्त वेळ बाहेर आपल्या कामावर असल्याने घरात ते फार वेळ देऊ शकत नाही बोलण्याकरिता वेळेचा अभाव वेळ आहे तर सोबती कामावर गेलेला घरात उदासिनता वाटण्यास लागते घरातील कामे कामाचा व्याप आर्थिक समस्या यामुळे स्वतःकडे लक्ष देऊ शकत नाही.

**घरात वयस्कर व्यकतींचा अभाव :-** प्रत्येक घरात वयस्कर व्यक्ती असणे आवश्यक असते ते घर सांभाळतात व आपल्या नांतवाडचा संभाळ योग्य पद्धतीने करून त्यांना भारतीय संस्कृतो, चांगले शिक्षण घरी देतात म्हणून प्रत्येक घरात आपले आई वडिल असणे आवश्यक असते आज आपण जे काही आहोत, मोठी पोस्ट, पैसा, संपत्ती, शिक्षण हे सर्व त्यांनी आपल्यासाठी केलेली अहोरात्र मेहनत, श्रम व त्याग त्यांना कदापि दुःखवू नये तर त्यांचा आशिर्वाद हा आम्हांस दिर्घ आयुष्य व भरभराट देतो, प्रत्येक सुनेने आपल्या सासु, सासऱ्यांना आई, वडिल समान वागणूक द्यावी, हे आमचे कर्तव्ये आहे.

**यशस्वी विवाह होण्याकरिता उपाययोजना :-** १. परस्पर आदर : एकमेकांवर विश्वास व प्रिती करणे, २. भावनिक व मानसिक सुरक्षितता असणे आवश्यक आहे, ३. उघडरित्या बोलणे : स्वतंत्रता एकमेकांना द्यावी, जेणेकरून आपापल्या गरजा, भावना ध्येये बोलू शकतात, ४. विकासाची धोरणे आखावी, ५. दुःखात व आनंदात एकमेकांना सहाय्य करावे, ६. एकमेकांना वेळ द्यावा, ७. एकमेकांच्या गरजा व भावना जाणून घ्याव्यात, ८. एकमेकांबरोबर खरेपणाने व सत्याने वागणे.

**घटस्पोटाची कारणे :-** १. सुसंवादाचा अभाव, २. आर्थिक ताण, तणाव, ३. विश्वासघात, ४. विसंगती, ५. कौटुंबिक हस्तक्षेप, ६. व्यसन व वाईट संगती, ७. मी पणा, ८. द्वेष भावना, ९. बदलती जीवन प्रणाली, १०. घरातील हिंसाचार, ११. सतत भांडणे व वाद, १२. गरजा व भावना व्यक्त करु न देणे, १३. भिन्न भिन्न ध्येये, १४. परस्पर विरोधी मुलभुत मूल्ये किंवा ज्ञानाचा अभाव, १५. वचनबद्धतेचा अभाव, १६. एकमेकांबरोबर एकनिष्ठ नसणे, १७. बेरोजगारी, १८. खर्चाच्या सवयी, १९. तीव्र मतभेद, २०. व्यभिचार आणि असाध्य आजार.

**जर तुम्हाला हा लेख आवडला असेल तर कृपया तुमचा अभिप्राय द्या. जर तुम्हाला कौटुंबिक, वैवाहिक जोडप्यांच्या समुपदेशनाबद्दल शिकण्यात रस असेल, किंवा वैवाहिक जोडप्यांच्या समुपदेशनासंदर्भात सेमिनार किंवा कार्यशाळा आयोजित करण्यास कोणी इच्छुक असेल तर प्रवीण साबळे समुपदेशक), समुपदेशन प्रशिक्षण केंद्र, इव्हँजेलिन बूथ हॉस्पिटल, अहिल्यानगर यांच्याशी संपर्क साधा. मोबाईल नं. ९२७००७०८४६.**

# ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण, नोंदणी व ओळखपत्र वितरण अभियानास सुरुवात

नगर – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण, नोंदणी व ओळखपत्र वितरण अभियान राबविण्यात येत असून, जिल्ह्यात ग्रामपंचायती, पंचायत समित्या तसेच संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून सर्वेक्षण व नोंदणीचे काम सुरू करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व ऊसतोड कामगारांनी आपल्या गावातील ग्रामपंचायत कार्यालय, संबंधित पंचायत समिती अथवा सर्वेक्षण पथकाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे.

२१ सप्टेंबर २०२१ व ३१ जानेवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयांतील तरतुदींनुसार लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने हे अभियान हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी स्मार्ट सर्विसेस प्रा. लि., पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

नोंदणीसाठी आधार कार्ड, बँक पासबुक, स्वयंघोषणापत्र, ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र तसेच रेशन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. नोंदणी केल्यानंतर ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार असून त्यांना अधिकृत ओळखपत्र उपलब्ध होणार आहे. तसेच भविष्यातील विविध शासकीय योजनांचा लाभ मिळविणे अधिक सोपे होणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा समन्वयक महेश आढाव यांच्याशी ९९२३१९५५२७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# टायपिंग परीक्षेची केंद्रे घरापासून ३ किलोमीटर अंतरावरच मिळावीत

नगर – येत्या जुलै महिन्यात होणाऱ्या टायपिंग परीक्षेसाठी परीक्षार्थींना त्यांच्या घरापासून जास्तीत जास्त ३ किलोमीटर अंतरावरच परीक्षा केंद्र उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी गोल्डन ग्रुप महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष आरिफ शेख यांनी जिल्हा परिषद आणि शिक्षण विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आरिफ शेख यांनी निवेदनात म्हटले आहे की, विद्यार्थ्यांच्या ओळखपत्रावरील पत्त्यानुसार त्यांना जवळचे केंद्र दिल्यास त्यांचा प्रवासाचा वेळ वाचेल आणि मानसिक ताण कमी होईल. अनेकदा केंद्र लांब असल्यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर पोहोचताना त्रास होतो, परिणामी तणावाखाली परीक्षेच्या पेपरमध्ये चुका होण्याची शक्यता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी हे केंद्र त्यांच्या निवासस्थानाच्या परिसरातील ३ किलोमीटरच्या परिघातच असावे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. तसेच परीक्षा केंद्रांवर पिण्याचे पाणी आणि अखंड वीजपुरवठा यांची व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून टायपिंगच्या परीक्षेत कोणताही तांत्रिक व्यत्यय येणार नाही. तसेच, परीक्षेची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत निश्चित करावी, जेणेकरून विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, अशी विनंतीही शेख यांनी प्रशासनाकडे केली आहे.




जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय शाळा १५ जून रोजी, नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत 'पहिला दिवस शाळेचा, एक तास खेळाचा' या संकल्पनेअंतर्गत करेल, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

# जिल्ह्यातील शासकीय शाळांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाचे स्वागत एका तासाच्या खेळातून

नगर – जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय शाळा १५ जून रोजी, नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत 'पहिला दिवस शाळेचा, एक तास खेळाचा' या संकल्पनेअंतर्गत करेल, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय खेळ दिनानिमित्त द ओपनट्री फाउंडेशन व स्नेहालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'खेळ जपा, बालपण जपा' या महाराष्ट्रातील पहिल्या जिल्हास्तरीय चर्चासत्रात ते बोलत होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य सत्यजीत सुधीर तांबे यांनी शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सृजनशीलता, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे असावे, असे सांगितले.

विद्यार्थीकेंद्रित, अनुभवाधारित व कौशल्याधारित शिक्षण व्यवस्थेची आवश्यकता अधोरेखित करत त्यांनी हा उपक्रम जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये आणि विशेषतः संगमनेर येथे लवकरात लवकर राबविण्याची इच्छा व्यक्त केली.

संयुक्त राष्ट्रांच्या बालहक्क करारातील कलम ३१ नुसार खेळाला प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क म्हणून मान्यता देण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील आनंददायी शिक्षणाच्या दृष्टिकोनाशी सुसंगत अशी सखोल चर्चा अहिल्यानगर जिमखाना येथे झाली. उद्घाटनपर भाषणात द ओपनट्री फाउंडेशनच्या सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्वेता चारी यांनी शिक्षण प्रक्रियेतून खेळ हरवल्यास मुलांच्या भविष्यावर होणाऱ्या परिणामांविषयी चिंता व्यक्त केली.

स्नेहालयाचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी खेळ हा मुलांपर्यंत पोहोचण्याचा सर्वोत्तम मार्ग असून त्यातून मुलांना स्वतःला व्यक्त करण्याची संधी मिळते, असे नमूद केले. नुवामा ग्रुपच्या ईएसजी व सीएसआर प्रमुख रश्मी नागोरी यांनी खेळाच्या माध्यमातून मुलांचा आत्मविश्वास व चिकित्सक विचारक्षमता वाढत असल्याचे सांगितले. नांदेडच्या संस्कृती संवर्धन मंडळाच्या शिक्षण प्रमुख श्रद्धा रोहित देशमुख यांनी खेळामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमधील भावनिक अंतर कमी होत असल्याचे निरीक्षण नोंदवले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन नोमोबोचे संस्थापक व द ओपनट्री फाउंडेशनचे विश्वस्त देवेंद्र नाईक यांनी केले.

येत्या काळात द ओपनट्री फाउंडेशन जिल्हा प्रशासनासोबत काम करून आपला उपक्रम जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमधील शाळांपर्यंत विस्तार करणार आहे. शाळांना क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणे, शिक्षकांना प्रशिक्षण देणे आणि अहिल्यानगरला क्रीडा-एकात्मिक शिक्षणासाठी महाराष्ट्रातील आदर्श जिल्हा बनविणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या परिषदेस महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी जुबेर पठाण, महिला व बाल विकास समितीच्या उपाध्यक्षा वर्षा सानप, विस्तार अधिकारी पोपटराव धामणे यांच्यासह गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

गेल्या २१ वर्षांपासून कार्यरत असलेल्या द ओपनट्री फाउंडेशन आणि अहिल्यानगरमधील स्नेहालय यांच्या २०१३ पासूनच्या सहकार्यामुळे राज्यातील १२ जिल्ह्यांमधील १० लाख मुले, १० हजार शिक्षक व ९०० शासकीय शाळांपर्यंत खेळाधारित शिक्षणाचा विचार पोहोचला आहे.

# इंधन बचतीसाठी नवीन वाहन खरेदीवर सरकारने तात्पुरती स्थगिती आणावी

## केंद्र व राज्य शासनाने ठोस धोरण आखण्याची स्वाती शिरसुल यांची मागणी



नगर – आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी पेट्रोल-डिझेलची मोठी बचत करणे काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर, नवीन वाहन खरेदीवर काही काळासाठी स्थगिती आणावी, असा पर्याय सामाजिक कार्यकर्त्या स्वाती सिरसुल यांनी सुचविला असून, त्यासाठी केंद्र व राज्य शासनाने ठोस धोरण आखावे, अशी मागणीही त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे.

आज अनेक कुटुंबांकडे सदस्यांच्या संख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक असल्याचे चित्र आहे. केवळ श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी किंवा हौसेसाठी महागडी वाहने खरेदी करण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेकदा एक-दोन किलोमीटरच्या अंतरासाठीही वाहनांचा वापर केला जातो. अल्पवयीन मुलांकडून दुचाकींचा होणारा वापर, सार्वजनिक वाहतुकीकडे होणारे दुर्लक्ष आणि खाजगी वाहनांचा अतिवापर यामुळे लाखो लिटर इंधन वाया जात आहे. शासनाने आता प्रत्येक कुटुंबासाठी वाहनांची मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे, असे सिरसुल यांनी पत्रकात म्हटले आहे.

विविध बँका आणि फायनान्स कंपन्यांकडून सहजपणे उपलब्ध होणाऱ्या कर्जामुळे गरज नसतानाही वाहने खरेदी केली जात आहेत. त्यामुळे वाहन कर्ज वितरणाबाबतही कठोर नियम व निर्बंध लागू करावेत, असेही त्यांनी सुचवले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन, गॅस आणि खाद्यतेलाच्या वापरात काटकसर करण्याचे केलेले आवाहन अत्यंत समयोचित असल्याचे सांगत, या विषयाचे राजकारण न करता प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागणे गरजेचे आहे, असे सिरसुल यांनी म्हटले आहे. इंधन टंचाई ही जागतिक समस्या असून, भारताने घेतलेली भूमिका आणि इतर देशांच्या तुलनेत भारतातील दर हे संयमित आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नवीन वाहन खरेदीवर तात्पुरती स्थगिती, इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन, एसटी, रेल्वे व सार्वजनिक वाहतुकीचा जास्तीत जास्त वापर, स्वयंपाकासाठी विजेवर चालणाऱ्या उपकरणांचा वापर, खाद्यतेलाच्या वापरात बचत करून अनावश्यक खर्च टाळावा, असे पर्याय सिरसुल यांनी सुचविले आहेत.

# श्रीमद्‌भागवत आणि भगवद्गीता हे भारतीय संस्कृतीचे अमूल्य आध्यात्मिक वैभव आहे

## भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज यांचे प्रतिपादन; अधिक मासाच्या अखेरच्या सप्ताहात श्रीमद्भागवत कथा सार ग्रंथ निरूपणास भक्तिमय प्रारंभ

नगर – अधिक मासाच्या अखेरच्या सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद्भागवत कथा सार ग्रंथ निरूपण सोहळ्याला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री काळेश्वर मंदिरात दर्शन घेऊन मंजुळ स्वरातील भजन, नामसंकीर्तन आणि शोभायात्रा काढण्यात आली. या मंगलमय वातावरणामुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या भागवत सप्ताहाच्या यजमानपदाचा लाभ संतोष रसाळ व सौ. सुखदा रसाळ यांना लाभला. त्यांच्या हस्ते श्रीमद्भागवत ग्रंथाचे पूजन तसेच निरूपणकार भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज (छत्रपती संभाजीनगर) यांचे विधिवत स्वागत व पूजन करण्यात आले. धार्मिक विधी वे. ना. उमेश वाळुंजकर व बंडोपंत धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

यावेळी आपल्या निरूपणात भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज म्हणाले की, श्रीमद्भागवत हा ग्रंथ मनुष्याचे जीवन आणि त्याचा शेवट किती मंगलमय, यशस्वी व मोक्षदायी होऊ शकतो, याचे उत्कृष्ट दर्शन घडवितो. राजा परीक्षिताच्या जीवनातून हे सत्य स्पष्टपणे समोर येते. रामायण आपल्याला आदर्श संसार कसा करावा हे शिकवते, तर महाभारत जीवनातील संघर्ष, कर्तव्य आणि धर्माचे तत्त्वज्ञान समजावून सांगते. रामायण आणि महाभारत ही भारतीय संस्कृतीची ओळख आहेत, तर श्रीमद्भागवत आणि भगवद्गीता हे भारतीय संस्कृतीचे अमूल्य आध्यात्मिक वैभव आहे. पुढे ते म्हणाले की, या ग्रंथांचे चिंतन अत्यंत एकाग्रचित्ताने करणे आवश्यक आहे. त्यासाठी इंद्रियसंयम, मनावर नियंत्रण आणि ईश्वरभक्ती आवश्यक आहे. राजा परीक्षिताने आपल्या आचरणातून हे जगासमोर सिद्ध करून दाखविले आहे.



अधिक मासाच्या अखेरच्या सप्ताहात श्रीमद्भागवत कथा सार ग्रंथ निरूपणास प्रारंभ करताना भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज.

निरूपणादरम्यान गोकर्ण आख्यानाचे प्रभावी आणि रसाळ विवेचन करण्यात आले. या आख्यानाने उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. भागवत कथा सार निरूपणामुळे अधिक मास अधिक फलदायी, पुण्यदायी आणि आध्यात्मिकदृष्ट्या परिपूर्ण होत असल्याची भावना उपस्थित भक्तांमध्ये व्यक्त होत होती.

संपूर्ण अधिक मासभर विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संगीत गुरुचरित्र पारायण, नारदीय कीर्तन, अभ्यासपूर्ण प्रवचने, गीता मंडळाच्या वतीने श्री ज्ञानेश्वरी पारायण, तसेच विविध धार्मिक ग्रंथांचे सामूहिक वाचन यांचा समावेश होता. एवढेच नव्हे तर दररोज सकाळी ८ ते १२ या वेळेत श्रीविष्णुसहस्रनाम पठण, पूजन, विष्णुयाग व इतर धार्मिक विधी नियमितपणे पार पडत होते. त्यामुळे संपूर्ण महिनाभर परिसरात भक्ती, साधना आणि अध्यात्माचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला.

या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी नीलकंठ देशमुख, दिनकर देशमुख, उमेश नगरकर, उमेश वाळुंजकर, डॉ. मुळे, राजेंद्र नगरकर, बंडोपंत धर्माधिकारी, निलेश धर्माधिकारी, सोमनाथ मुळे, समीर उपाध्ये, उदय वैकर, अनंत देशपांडे, रमेश देशपांडे तसेच गीता मंडळातील महिला सदस्यांचे सहकार्य लाभले. याशिवाय असंख्य भाविक भक्तांच्या प्रेम, श्रद्धा, समर्पण आणि उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण अधिक मासातील सर्व धार्मिक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडले. भक्तांच्या सहकार्यामुळे परिसरात सात्त्विकता, भक्तीभाव आणि आध्यात्मिक चेतनेचे अद्वितीय वातावरण निर्माण झाले होते.

अधिक मासाच्या या धार्मिक पर्वाने भक्तांच्या मनात भक्ती, ज्ञान आणि वैराग्याची अमूल्य शिदोरी निर्माण केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ‘स्व. आ. शिवाजीराव कर्डिले नेत्रालय’ उभारणीसाठी जागा उपलब्ध करून देणार

**आमदार अक्षय कर्डिले यांचे आश्वासन, दृष्टीदान दिनानिमित्त ३७० नागरिकांची मोफत नेत्र तपासणी; ४८ रुग्णांवर मोतीबिंदू व काचबिंदू शस्त्रक्रिया होणार**



फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला ज्येष्ठ नागरिकांसह ग्रामस्थांचा प्रतिसाद लाभला. याप्रसंगी उपस्थित असलेले आ. अक्षय कर्डिले आदी.

नगर – सामाजिक बांधिलकी जपत गेली अनेक वर्षे संस्था आरोग्यसेवेच्या क्षेत्रात फिनिक्स सोशल फाऊंडेशन उल्लेखनीय कार्य करत आहे. स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांचाही या सामाजिक कार्याशी जवळचा संबंध होता. त्यांच्या हस्ते अनेक आरोग्य शिबिरांचे उद्घाटन झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या ‘स्व. आ. शिवाजीराव कर्डिले नेत्रालय’ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाद्वारे गरजू, गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना अत्याधुनिक आणि मोफत नेत्रोपचार उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस प्रेरणादायी आहे. या प्रकल्पासाठी बुऱ्हाणनगर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासनही आमदार अक्षय कर्डिले यांनी दिले.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नागरदेवळे (ता. नगर) येथे जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला ज्येष्ठ नागरिकांसह ग्रामस्थांचा प्रतिसाद लाभला. नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करतानाच नागरिकांच्या विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. विशेष म्हणजे, मागील ३५ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या या सामाजिक उपक्रमातून आतापर्यंत तब्बल ३ लाख ९७ हजार ४४७ रुग्णांवर मोफत नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आल्या असून हजारो कुटुंबांच्या जीवनात नव्या आशेचा प्रकाश निर्माण करण्यात आला. नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात आयोजित शिबिराचे उद्घाटन आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संदिप कर्डिले, महेश झोडगे, दत्ता तापकिरे, फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे, माजी सरपंच राम पानमळकर, उपसरपंच सोनू भुजबळ, ग्रामपंचायत सदस्य मयुर पाखरे, ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड, कामगार तलाठी आदिनाथ निकम, डॉ. विशाल घंगाळे, राजेंद्र बोरुडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी प्रकल्पाविषयी माहिती देताना सांगितले की, तपोवन रोड परिसरात प्रस्तावित असलेल्या ‘स्व. आ. शिवाजीराव कर्डिले नेत्रालय’चे आराखडे व डिझाइन अंतिम टप्प्यात असून आवश्यक प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. लोकवर्गणी, समाजातील दानशूर व्यक्तींचे योगदान आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सहभागातून हा महत्त्वपूर्ण प्रकल्प साकारला जाणार आहे. भविष्यात या नेत्रालयाच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील गरजू रुग्णांना दर्जेदार, अत्याधुनिक आणि पूर्णतः मोफत नेत्रोपचार सुविधा उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली ३७० नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर ४८ रुग्णांवर पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोतीबिंदू व काचबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. तसेच गरजू नागरिकांना अल्पदरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांसाठी रक्तदाब, मधुमेह आणि इतर आरोग्य तपासण्यांची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

प्रास्ताविक ग्रामविस्तार अधिकारी नेताजी भाबड यांनी केले, तर स्वागत माजी सरपंच राम पानमळकर यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गौरव बोरुडे, सौरभ बोरुडे, बाबासाहेब धीवर, राजेंद्र बोरुडे, रवी बालटे, ओम बोरुडे, जय बोरुडे, जगदिश बोरुडे यांच्यासह बुधराणी हॉस्पिटलचे सचिन पगार, विशाल भिंगारदिवे, फिनिक्स फाऊंडेशनचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. उपसरपंच सोनू भुजबळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# चैतन्य बडे आणि मित्रांनी तत्परता दाखवत वाचवले अपघातात अडकलेल्या चालकाचे प्राण



नागापूर परिसरात उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. त्याच ठिकाणी अपघातग्रस्त ट्रकमधील चालकाला वाचविताना चैतन्य बडे व इतर तरुण. (छाया – लहू दळवी)

नगर – संकटाच्या काळात मदतीसाठी धावून जाणारी माणसेच समाजाचे खरे आधारस्तंभ असतात, याचा प्रत्यय एमआयडीसी नागापूर येथे घडलेल्या एका भीषण अपघाताच्या घटनेत आला. महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते अशोक बडे यांचे चिरंजीव चैतन्य बडे आणि त्यांच्या मित्रपरिवाराने दाखवलेल्या समय सूचकतेमुळे एका अपघातग्रस्त चालकाचे प्राण वाचले आहेत. वेळेवर मदत, तातडीने उपलब्ध करून दिलेली यंत्रसामग्री आणि रुग्णालयात दाखल करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे चैतन्य बडे व त्यांच्या सहकाऱ्यांवर सध्या सर्वस्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

अहिल्यानगर – शिर्डी महामार्गावरील एमआयडीसी नागापूर परिसरात सध्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. याच ठिकाणी मध्यरात्री १२ ते १२:३० च्या सुमारास एका आयशर ट्रकचा भीषण अपघात झाला. धडक इतकी जोरदार होती की, ट्रकचा चालक वाहनाच्या केबिनमध्ये अडकून पडला होता. रात्रीची वेळ, अंधार आणि अपघाताचे भीषण स्वरूप पाहता चालकाच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता.

अपघाताची माहिती मिळताच चैतन्य बडे यांनी तातडीने आपल्या मित्रपरिवारासह घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये पप्पू बडे, आनंद बडे, भरत बडे, सचिन बडे, संदीप बडे आणि राकेश ठाकूर यांचा समावेश होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून या सर्वांनी सर्वप्रथम पोलिस प्रशासनाशी संपर्क साधला आणि बचावकार्याला गती दिली.

बचावकार्यासाठी तातडीने क्रेनची व्यवस्था करण्यात आली. तसेच जखमी चालकाला त्वरित उपचार मिळावेत यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली. चैतन्य बडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रात्रभर घटनास्थळी थांबून अथक प्रयत्न केले. अखेर पहाटे २ वाजण्याच्या सुमारास चालकाला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. त्यानंतर त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. वेळेवर मिळालेल्या उपचारामुळे संबंधित चालकाचा जीव वाचला आहे. कोणतीही अपेक्षा न ठेवता चैतन्य बडे आणि त्यांच्या मित्रांनी दाखवलेली सामाजिक बांधिलकी व संवेदनशीलता पाहून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. ही तत्परता समाजातील इतर युवकांसाठी निश्चितच प्रेरणादायी आणि आदर्शवत असल्याचे मत व्यक्त होत आहे.



तपोवन रोड येथील बालघर प्रकल्पातील ४५ निराधार विद्यार्थ्यांना भूपेंद्र परदेशी मित्र मंडळ व जय आनंद मॉर्निंग ग्रुपच्या वतीने फनकी लॅण्ड मध्ये विविध खेळांचा मनसोक्त आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी भूपेंद्र परदेशी, किरण राका, शांतीलाल संकलेचा, अनिल सुराणा, सचिन छाजेड, कमलेश गुगळे, संग्राम परदेशी, चंदन पवार, महेश पवार, संजू सानप, रोहित आहुजा, विनू वागस्कर, संतोष ठाकूर, चेतन लखापती, दुर्गेश सानप, सागर देवसानी, गजेंद्र दांगट आदी.

# शहरातील खिस्त गल्लीच्या रस्त्यावरील खड्डे बुजवावेत

**माळीवाडा बसस्थानक परिसरातील ट्रॅव्हल्सचे अतिक्रमण हटवा : अॅड. देवेंद्र बंब**

नगर – शहरातील खिस्त गल्ली ते कोतवाली पोलीस स्टेशन या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या रस्त्याची पाहणी केल्यानंतर, खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे तातडीने मुरूम, खडी आणि डांबर वापरून हे रस्ते दुरुस्त करावेत, तसेच माळीवाडा बसस्थानक परिसरात अनधिकृतपणे सुरु असलेले ट्रॅव्हल्स एजन्सींचे अतिक्रमण तात्काळ हटवावे, अशी मागणी भाजपचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य अॅड. देवेंद्र बंब यांनी महापालिकेकडे केली आहे.

बंब यांनी याबाबत उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे, शहरातील ख्रिस्त गल्ली ते कोतवाली पोलीस स्टेशन या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमधून मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे तातडीने हा रस्ता दुरुस्त करण्याची गरज आहे.

तसेच शहरात कोणताही व्यवसाय करण्यासाठी परवाना घ्यावा लागतो. मात्र, माळीवाडा बस स्थानक परिसरात ट्रॅव्हल्स एजन्सीने अतिक्रमण करुन तिकीट विक्रीचे कार्यालय सुरु केले आहे. त्यासाठी त्यांनी रितसर कामगार विभाग, परिवहन विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक होते. मात्र, तशी कोणतीही परवानगी न घेता रस्त्यावर लोखंडी शेड उभारुन अतिक्रमण करीत बेकायदेशीर व्यवसाय सुरु केला आहे. त्यामुळे संबंधित एजन्सीकडून महापालिका आणि शासनाचे आर्थिक नुकसान केले जात असून, वाहतुकीलादेखील अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे संबंधित एजन्सीचे अतिक्रमण महापालिकेने तात्काळ हटवावे. महापालिकेने हे अतिक्रमण कायमस्वरूपी काढून टाकावे आणि संबंधित ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी नोटीस बोर्ड लावावा, तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दरमहा याचा अहवाल सादर करावा, अशी मागणी अॅड. बंब यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# प्रभाग क्रमांक २ मधील परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध

**नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके**



प्रभाग क्रमांक २ मधील संदेशनगर परिसर चौक सुशोभीकरण कामाचा शुभारंभ नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला. यावेळी नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, सुनील त्र्यंबके, विनीत पाऊलबुधे, बाळासाहेब पवार, आकाश त्र्यंबके, भास्कर चेमटे, विद्याधर कुलकर्णी, सुजाता शिंदे, सुरेखा बनकर आदी. (छाया – विजय मते)

नगर – सावेडी उपनगरात प्रभाग क्रमांक २ मध्ये संदेशनगर व परिसरातील चौक सुशोभीकरण, श्रीराम चौक ते वसंत टेकडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पेव्हिंग ब्लॉक बसवून सुशोभीकरण अशा विविध विकास कामाचा शुभारंभ नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, विनीत पाऊलबुधे, आकाश त्र्यंबके, सुजाता शिंदे, सुरेखा बनकर, राजश्री पिंपळे, भास्कर चेमटे, किशोर वाणे, महेश टाक, गोरक्षनाथ आव्हाड, वैभव पोकळे, विद्याधर कुलकर्णी, प्रकाश कलंके, दत्तात्रय जरे, कृष्णा आंधळे धीरज उकिरडे, देविदास गुडा, अमर मेटू, विकी करोलिया, सचिन लोटके उपस्थित होते.

श्रीराम चौक ते वसंत टेकडी हा परिसर दाट लोकवस्तीचा असून या रस्त्याच्या सुशोभीकरणामुळे वाहतुकीची सुविधा सुधारण्याबरोबरच परिसर अधिक आकर्षक आणि सुस्थितीत दिसणार आहे.

नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके म्हणाल्या की, आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिकांना विकासकामांची भेट देणे हीच त्यांना खरी शुभेच्छा ठरणार आहे.

यावेळी नगरसेवक निखिल वारे म्हणाले शहराच्या प्रत्येक भागात दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, रस्ते सुस्थितीत राहावेत आणि नागरिकांचे जीवनमान उंचावावे यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक २ मध्ये अनेक विकासकामे हाती घेण्यात आली असून भविष्यातही नागरिकांच्या गरजांनुसार विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. संदेशनगर चौक सुशोभीकरण, त्याच बरोबरच रोजगार उपलब्ध होण्यासाठी चौपाटी करण्याचा आमचा मानस आहे, त्यांनी सांगितले.

बाळासाहेब पवार म्हणाले, विकास हा केवळ आश्वासनांचा विषय नसून तो प्रत्यक्ष कृतीतून दिसला पाहिजे. नागरिकांनी दाखविलेला विश्वास आणि सहकार्य यामुळेच विविध कामे मार्गी लागत आहेत. प्रभागातील प्रत्येक रस्ता, गटार, पाणीपुरवठा आणि सुशोभीकरणाच्या कामांमध्ये गुणवत्ता राखण्यास प्राधान्य दिले जाणार असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही ४ ही नगरसेवक सदैव उपलब्ध राहू. परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांचे परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

नागरिकांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत आ. संग्राम जगताप आणि नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, बाळासाहेब पवार यांचे आभार मानले.



अधिक मासानिमित्त जोशी परिवाराच्या वतीने विश्वकल्याणासाठी वेदो मंत्रोच्चारात श्री विष्णूयाग करण्यात आला. भक्तिमय वातावरणात या सोहळ्याची पूर्णाहुती करण्यात आली.

# श्री विष्णूयागामुळे भक्ती, श्रद्धा आणि धार्मिक वातावरणाची निर्मिती

**उद्योजक राजकुमार जोशी यांचे प्रतिपादन**

नगर – हिंदू धर्मात अधिक मासाला अनन्यसाधारण महत्व आहे. या पुण्यकाळात श्री विष्णूयाग करणे, अन्नदान करणे हे महापुण्यांचे समजले जाते. श्री विष्णूयागामुळे परिसरात भक्ती, श्रद्धा आणि धार्मिक वातावरण निर्माण झाले होते परमेश्वराच्या कुपेमुळे जोशी परिवाराच्या वतीने नगर शहरात प्रत्येक अधिक महिन्यात विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी पुढाकार घेत आहे. आमच्या पणजोबांपासून ही परंपरा आजपर्यंत अखंडितपणे सुरु आहे. या वर्षीच्या श्री विष्णूयागाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, असे प्रतिपादन उद्योजक राजकुमार जोशी यांनी केले.

अधिक मासाच्या पावन पर्वकाळात विश्वकल्याणासाठी व समस्त प्राणिमात्रांच्या सुख समाधानासाठी वेदो मंत्रोच्चारात भक्तिमय वातावरणात श्री विष्णूयाग संपन्न झाला. श्री गजानन महाराज मंदिरात बन्सी महाराज मिठाईवाले जोशी परिवाराच्या वतीने झालेल्या या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी उपस्थित राहून यागाच्या दर्शनाचा लाभ घेतला.

एकदिवसीय श्री विष्णूयाग मध्ये पुरोहितांनी वेदोमंत्रोच्चारात सर्व धार्मिक विधी, होम हवन, पूर्णाहुती व महाआरती आदी विधिवत पार पडल्या. आशीष गोपीकृष्ण शर्मा, सौ.राखी शर्मा, कुमार नवले व सौ.स्वाती नवले यांनी यागाचे यजमान पद भूषवले. यावेळी संयोजक राजकुमार जोशी, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष प्रा. मधुसूदन मुळे, मनोज जोशी, धीरज जोशी, गिरीश जोशी, माजी नगरसेविका सुप्रिया जाधव, नगरसेविका गौरी बोरकर, शिरीष जानवे, प्रिया जानवे, महेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यागाच्या पूर्णाहुतीनंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमास गिता गिल्डा, स्वाती शिरसुल, ज्योती दांडगे, अशोक गायकवाड, रूद्रेश अंबाडे, रेणुका करंदीकर, विशाल साबळे, आदिनाथ म्हस्के, विशाल लेंभे, नीमा लेंभे व परिसरातील भाविक उपस्थित होते.

# मेगा कृषी कर्ज अभियान मेळाव्यात २५ कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी

**स्वयंरोजगार व ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना : नरेशकुमार दुबे**




सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने समनापूर येथे क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमार दुबे यांच्या प्रमुख झालेल्या शेतकरी, महिला बचत गटांच्या मेळाव्यात २५ कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी देण्यात आली.

नगर – देशातील पहिली स्वदेशी आणि राष्ट्रीयीकृत बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे यांच्या प्रमुख उपस्थितीत संगमनेर तालुक्यातील समनापूर येथे देशव्यापी मेगा कृषी कर्ज अभियान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास शेतकरी, महिला बचत गट, कृषी उद्योजक आणि ग्रामीण भागातील व्यावसायिकांचा प्रतिसाद लाभला. या मेळाव्यात विविध कृषी व स्वयंरोजगार योजनांसाठी तब्बल २५ कोटी रुपयांच्या कर्ज प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

क्षेत्रीय प्रबंधक नरेशकुमार दुबे म्हणाले, कृषी क्षेत्राला आर्थिक बळकटी देणे, शेतकऱ्यांना सुलभ कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. कृषी कर्जवाटप वाढविण्यासाठी शेतकरी व महिला बचत गटांना प्राधान्य देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून प्रयत्न करत आहोत. सेंट्रल बँक ऑफ इंडियाची धोरणे शेतकरी आणि महिला बचत गटांसाठी अनुकूल असून शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्याचा बँकेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी यांनी जिल्ह्याची अग्रणी बँक म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडियाने राज्य शासनाच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने पुढाकार घेतल्याचे नमूद केले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आर्थिक उन्नतीमध्ये बँकेचे मोठे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

कुंदन कोरडे म्हणाले, महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणात सेंट्रल बँक ऑफ इंडियाची भूमिका उल्लेखनीय असल्याचे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. अकोले व गणोरे परिसरातील अनेक महिला बचत गटांना तारणमुक्त कर्ज उपलब्ध झाल्याने त्यांनी विविध व्यवसाय सुरू करून कुटुंबाचा उदरनिर्वाह त्या चालवत आहेत बचत गटांना एक वेगळी चालना बँकेमुळे मिळाली असल्याचे ते म्हणाले.

अग्रणी जिल्हा व्यवस्थापक आशिष नवले यांनी पीक कर्ज, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कृषी प्रक्रिया उद्योग, कृषी यांत्रिकीकरण तसेच महिला बचत गटांसाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. अधिकाधिक शेतकरी व ग्रामीण उद्योजकांनी या योजनांचा लाभ घेऊन आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास मुख्य प्रबंधक हरिपाल अडसूळ, शांता गागरे, शाखाधिकारी, सुरज शिरसाठ यांच्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटांचे प्रतिनिधी आणि शेतकरी उपस्थित होते.

सूत्रसंचालन निलेश परवत यांनी केले. चंद्रशेखर घोडेकर यांनी आभार मानले. या मेगा कृषी कर्ज अभियानामुळे शेतकरी, महिला बचत गट आणि ग्रामीण उद्योजकांना आर्थिक पाठबळ मिळून कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थित शेतकऱ्यांनी यावेळी केला व्यक्त केला.

# ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नगरचे सीए (डॉ.) शंकर अंदानी यांची एकमताने निवड

## आषाढी एकादशी व छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त निमगाव वाघा येथे राज्यस्तरीय संमेलन

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने २५ जुलै रोजी आषाढी एकादशी तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त 'जगतगुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्य, समाजकारण आणि लेखा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अहिल्यानगरचे सीए (डॉ.) प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. संमेलनाच्या नियोजनासाठी शहरात आयोजित बैठकीत संयोजन समितीने सीए अंदानी यांच्या नावावर एकमताची मोहर उमटविली. संमेलनाचे प्रमुख संयोजक पै. नाना डोंगरे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, प्रा. गणेश भगत, जालिंदर बोरुडे, संजय सावंत, संदीप रासकर, सरोज आल्हाट यांच्यासह साहित्यप्रेमी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांनी मराठी आणि हिंदी साहित्य क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात त्यांनी अनेक अभूतपूर्व विक्रम नोंदविले असून एकाच दिवशी तब्बल १०६ स्वलिखित पुस्तके प्रकाशित करण्याचा जागतिक विक्रम त्यांच्या नावावर आहे. याशिवाय 'आई' या विषयावर आधारित ५१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचाही मान त्यांनी मिळविला आहे.



त्यांनी आजवर लिहिलेल्या १२ हजार १०० हून अधिक कवितांचे विविध ग्रंथांमधून प्रकाशन झाले असून हा देखील स्वतंत्र जागतिक विक्रम म्हणून नोंदविण्यात आला आहे. साहित्य क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबवत त्यांनी 'वडील : बाबा अबोल जीवनाचे कोडे' या शीर्षकाखाली महाराष्ट्रातील ८० कवींच्या ११६१ कवितांचे संकलन करून मराठीतील एक भव्य काव्यसंग्रह प्रकाशित केला. तसेच 'बहिण माझी प्रिय ताई' या नावाने बहिणीवरील ११६१ कवितांचे स्वतंत्र संकलन प्रकाशित करून कौटुंबिक नातेसंबंधांवरील साहित्याला नवी दिशा दिली.

अंदानी यांच्या या विक्रमी साहित्यिक कार्याची दखल लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली असून त्यांच्या नावावर अनेक विक्रमांची नोंद करण्यात आली आहे. साहित्यिक कार्याबरोबरच सीए अंदानी हे सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणूनही परिचित आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी मंदिरे, मस्जिद, चर्च, धर्मशाळा तसेच विविध सामाजिक संस्थांना अत्यल्प मानधनात किंवा विनामूल्य लेखा आणि करसल्लागार सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. २०२२ मध्ये तब्बल ३६४ धार्मिक व सामाजिक संस्थांचे आर्थिक व करसल्लागार काम काज सांभाळल्याबद्दल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने त्यांची स्वतंत्र विक्रम नोंद केली होती. त्यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि व्यावसायिक योगदानाची दखल घेत अमेरिकेसह विविध देशांतील संस्थांनी त्यांना 'मेडल ऑफ एक्सलन्स'सह अनेक प्रतिष्ठित सन्मानांनी गौरविले आहे. आतापर्यंत त्यांना सुमारे ३१८० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार, ११५ जागतिक विक्रमांची नोंद आणि १५० मानद डॉक्टरेट पदव्या प्राप्त झाल्या आहेत.

व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट असलेले सीए शंकर अंदानी यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथे सलग १८ वर्षे करसल्लागार म्हणून सेवा बजावली आहे. तसेच अहिल्यानगर महानगरपालिका, विविध शासकीय संस्था, बँका, पतसंस्था आणि सामाजिक संघटनांचे लेखापरीक्षक व करसल्लागार म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. साहित्य, समाजसेवा आणि व्यावसायिक क्षेत्रातील त्यांच्या बहुआयामी कार्याचा गौरव म्हणून संयोजन समितीने त्यांची संमेलनाध्यक्षपदी निवड केली आहे.

या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात राज्यभरातील नवोदित आणि ज्येष्ठ साहित्यिक सहभागी होणार आहेत. साहित्य क्षेत्रातील विविध विषयांवर परिसंवाद, चर्चासत्रे आणि विचारमंथनाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच काव्यसंमेलनात अनेक नामवंत कवी-कवयित्री आपल्या रचना सादर करणार आहेत. समाजातील विविध क्षेत्रांत निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी विशेष पुरस्कारांचे वितरणही या संमेलनात करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अवचिता परिमळू

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स



एकदा किनई अचानक आली मंद वाऱ्याची झुळूक. मी बसले होते घरात. तिचा आणला मंद सुगंध. भेटीची आतुरता वाढवणारा, मी उठले एकदम. माझ्या तापतप्त मनाचा तो आसरा. लगेच मनाला झोंबले की तोच आला असला पाहिजे, गोपाळ ! मी मोहरले क्षण का! तरी अंदाज घेत घेतच आले बाहेर घराच्या, गोपाळाला भेटायला. पण कुठला गोपाळ ? मी फसले! असे कसे कुणाला गोपाळ समजले? आता उमजले. मनी रंगले त्याचेच हे चित्र समोर उमटले.

इथे ज्ञानेश्वरांची भूमिका स्वतः ला मानते ईश्वराची प्रेमिका. प्रेयसीची विरहापायी होणारी वेडी अवस्था, प्रेमिकेच्या मनाची दर्शविते व्यथा. ही एक भक्तीची पद्धती. हिला म्हणतात 'मधुराभक्ती.' भक्तीची ही रीतच न्यारी! संत गुलाबराव महाराज याच पंथातले. ज्ञानेश्वर कन्या असे स्वतःला त्यांनी मानले. त्यांनीही अशीच पदे रचिली दीनवाणी! जशी संत ज्ञानेश्वरींची ही विराणी !

तसे पाहिले तर आज नसतो का प्रत्येकाच्याच मनी 'एक श्रीरंग ? दिवसाढवळ्या डोळ्यांपुढे तरळणारे स्वप्नतरंग ? त्याच्यातच असतो तो सदा दंग! प्रत्येकच बांधतो आयुष्यात खूप नाव कमवायचा चंग. तोच त्याला श्रीरंग! पण या श्रीरंगाची काय हो खूण ? ती ज्याची त्यालाच ये समजून. म्हणून तर ध्येयापायी सुचत नाही काही. त्या ध्येयानेच भरल्या दिशा दाही. ते ध्येयच माणूस सर्वत्र पाही. पण मध्येच वरच्या विराणीतल्या विरहिणीसारखी विचलित होई. पण नको रे तरुण मना असा घाबरू. तुझी निष्ठा, तुझे श्रम व तुझा प्रामाणिक यत्न हाच तुझा तारू.

एक होता शेतकरी. त्याला तीन मुले. खूप आळशी. पैशासाठी मात्र भांडायचे बापाशी. पैसे उधळायचे. बाकी कुठेही लक्ष नसायचे. पुढे शेतकरी मरण पावला. पैसे कुठून आणायचे ? आमच्यासाठी पैसे नाही ठेवले म्हणून ते ओरडू लागले.

शेजारी म्हणाला, 'अरे, तुम्हाला ठाऊक नाही ? तुमच्या वडिलांनी पैसे शेतात पुरले. ते पुरलेले पैसे खोदून काढा!' आळशांना खोदणे जिवावर आले. तरी एकाने कुदळ घेतलीच. सगळे शेत खोदले. तेवढ्यात पाऊस पडला. आळशी मुले घरातले धान्य विकायला नेत होती. ते पावसात सापडले. त्याचे धान्य शेतात पडले. पावसामुळे जमिनीत रुजले. दोघेही आळशी भाऊ हिरमुसले. पण खोदणाऱ्याला तरी कुठे धन मिळाले? शेजारी म्हणाला, 'सहा महिने वाट पाहा. खोदलेल्या जमिनीतून आपोआप धन बाहेर येईल. '

आणि खरेच झाले! धान्य अमाप पिकले ! खूप पैसे घरात आले. शेतीत धन पुरलेलेच असते. या भावांना समजले. शेजारी म्हणाला होता. त्याचा अर्थ लक्षात आला. आता ते शेत खोदत, पावसाची वाट पाहात. मग धान्य पेरत, अमाप पीक मिळवत ! पैसा कमावत.

– किशोर गांधी

# आशा टॉकीज चौक ते हौसिंग हॉस्पिटलपर्यंत बंद पाईप गटार व रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

नगर – शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभाग क्रमांक १२ मध्ये विविध विकासकामांना वेग देण्यात येत आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांना कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आशा टॉकीज चौक, श्रीपाद ग्रंथ भंडार ते हौसिंग हॉस्पिटल या मार्गावरील बंद पाईप गटार व रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ उत्साहात झाला.

यावेळी बोलताना नगरसेवक विकी जगताप म्हणाले की, प्रभाग क्रमांक १२ हा जुन्या गावठाण भागातील असून या भागातील अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहिले आहेत. त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे न झाल्यामुळे काही भागांमध्ये दूषित पाणीपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला असून त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. आता हे प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून विकासकामांना गती दिली जाणार आहे. प्रभागातील नागरिकांना विश्वासात घेऊन टप्प्याटप्प्याने सर्व विकासकामे मार्गी लावली जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.



प्रभाग क्रमांक १२ मध्ये आ. संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आशा टॉकीज चौक ते हौसिंग हॉस्पिटलपर्यंत बंद पाईप गटार व रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ करताना नगरसेवक विकी जगताप. (छाया – लहू दळवी)

मनपा प्रभाग क्रमांक १२ मध्ये आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून आशा टॉकीज चौक, श्रीपाद ग्रंथ भंडार ते हौसिंग हॉस्पिटलपर्यंतच्या बंद पाईप गटार व रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ नगरसेवक विकी जगताप यांच्या हस्ते झाला. यावेळी माजी नगरसेवक प्रा. माणिकराव विधाते, संतोष गेन्नाप्पा, संग्राम रासकर, वाल्मीक कुलकर्णी, दिनेश लोंढे, ॲड. सुभाष काकडे, पुष्कर कुलकर्णी, अमोल निस्ताने, कमलेश भंडारी, डॉ. अभिजीत हौसिंग, पवन गुंदेचा, गंगानाथ सोनवणे, किशोर देशमुख, सतीश वैद्य, भैय्या घुले, चेतन सादुल, अंबादास सोनवणे, मोहित गांधी, विशाल थोरात यांच्यासह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

प्रा. माणिकराव विधाते म्हणाले की, प्रभागात पूर्वी झालेली काही विकासकामे निकृष्ट दर्जाची असल्यामुळे ती पुन्हा करण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. श्रीपाद ग्रंथ भंडार परिसरात कायम ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहताना दिसते. त्यामुळे त्या भागात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत होता. आता आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून बंद पाईप गटार आणि रस्ता काँक्रिटीकरणाचे दर्जेदार काम सुरू होत आहे. पुढील अनेक वर्षांचा विचार करून शहरात नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे केली जात असल्यामुळे ही कामे पुन्हा पुन्हा करण्याची गरज भासणार नाही. ते पुढे म्हणाले की, प्रभाग क्रमांक १२ मध्ये विविध विकासकामांचे प्रश्न प्रलंबित असून ते सोडविण्यासाठी नगरसेवक विकी जगताप सातत्याने प्रयत्नशील आहेत. नागरिकांच्या सहकार्याने आणि लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे या भागाचा विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक पुष्कर कुलकर्णी यांनी केले. संग्राम रासकर यांनी आभार मानले.

# लष्कराच्या अग्निशमन दलात अहिल्यानगरचे महेश हजारेंची 'स्टेशन ऑफिसर'पदी पदोन्नती



नगर – भारतीय लष्कराच्या अग्निशमन दलात कार्यरत असलेले 'लीडिंग फायरमन' महेश हजारे यांची 'स्टेशन ऑफिसर' या महत्त्वाच्या पदावर पदोन्नती झाली असून, रेकॉर्ड्स ऑफिसने यासंदर्भातील अधिकृत आदेश नुकतेच जाहीर केले आहेत.

मूळचे अहिल्यानगर शहरातील हडको भागातील रहिवासी असलेले महेश हजारे सध्या पुणे येथील खडकी येथे कार्यरत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या (डीपीसी) बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, त्यांची ही पदोन्नती ३० एप्रिल पासून लागू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पदोन्नतीनंतरही त्यांची नियुक्ती सध्या कार्यरत असलेल्या ठिकाणीच कायम ठेवण्यात आली आहे.

पदोन्नती मिळाल्यानंतर एका छोटेखानी समारंभात त्यांनी स्टेशन ऑफिसर या पदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारला आहे. लष्कराच्या अग्निशमन सेवेमध्ये त्यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची आणि त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन ही मानाची पदोन्नती त्यांना प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल मुंबई येथील महावितरण कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी विजय दुधभाते, पत्रकार सचिन अग्रवाल आदींनी अभिनंदन केले.

# जमाबंदी आयुक्तांच्या कार्यपद्धतीने शेत रस्ते मोजणीला गती

## शिवपानंद चळवळीच्या वतीने सन्मान; आयुक्त शैलेश नवाल शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे स्वप्न पूर्ण करतील : शरद पवळे

नगर – राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित जमीन मोजणी, हद्दनिश्चिती आणि शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक हालचाली सुरू झाल्या असून, जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर घेतलेल्या निर्णयांमुळे भूमिअभिलेख विभागात झिरो पेण्डन्सीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात आहे. या निर्णयांमुळे महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या सातत्यपूर्ण संघर्षाला मोठे यश मिळाल्याची भावना चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी व्यक्त केली.

राज्यातील हजारो शेतकरी वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मोजणी प्रकरणांमुळे त्रस्त होते. पारनेर तालुक्यातच सुमारे २,५०० हून अधिक मोजणी प्रकरणे रखडली असून, शेतरस्ते, हद्दनिश्चिती आणि मालकी हक्काच्या प्रश्नांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता.

सध्या भूमिअभिलेख विभागात केवळ ८ नियमित कर्मचारी कार्यरत असून १८ खासगी व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मदतीने कामकाज सुरू आहे. प्रलंबित २,२३३ मोजणी प्रकरणांपैकी ९७३ प्रकरणांना तारखा देण्यात आल्या असून १,२६० प्रकरणांना अद्याप तारखा देणे बाकी आहे. उपअधीक्षक वर्ग-२ ची दोन पदे आणि वर्ग-३ ची नऊ पदे रिक्त असल्याने कामकाजावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.



जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने ११ जून रोजी पुणे येथील कार्यालयात शरद पवळे आणि रविंद्र खुडे यांनी पुष्पगुच्छ देऊन आयुक्त शैलेश नवाल यांचा सन्मान केला.

या पार्श्वभूमीवर राज्यभरातील भूमिअभिलेख कार्यालयांना अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा तसेच खाजगी भूकरमापकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे मोजणी प्रक्रियेला वेग मिळून शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा निपटारा जलदगतीने होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते तथा अध्यक्ष शरद पवळे आणि राज्य प्रसिद्धी प्रमुख रविंद्र खुडे यांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी केलेल्या संघर्षाची शासनाने दखल घेतली आहे. जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे राज्यातील शेतरस्ते आणि मोजणी प्रश्नांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पारनेर तालुक्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणे येत्या दोन महिन्यांत निकाली काढण्याचे नियोजन करण्यात आले असून, उपअधीक्षकांसह सुमारे २० अतिरिक्त भूकरमापकांची नियुक्ती करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. तसेच रोड मॉडेल व्हिलेज संकल्पनेअंतर्गत गावांतील सर्व शेतरस्त्यांच्या हद्दी निश्चित करून झिरो पेण्डन्सीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने ११ जून रोजी पुणे येथील कार्यालयात शरद पवळे आणि रविंद्र खुडे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना शरद पवळे म्हणाले, राज्यातील गरजू शेतकऱ्यांच्या हक्काच्या प्रश्नांवर न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळ यापुढेही संघर्षाची भूमिका कायम ठेवणार आहे. पुणे येथे जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांचा महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने शरद पवळे व रविंद्र खुडे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

# भिंगारमध्ये वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व ज्येष्ठ नागरिकांना मिष्टान्न भोजन

## हरदिन मॉर्निंग ग्रुप व राष्ट्रवादी काँग्रेसचा उपक्रम

नगर – हरदिन मॉर्निंग ग्रुप आणि भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. तसेच शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर बालभवनमधील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याशिवाय रोकडेश्वर हनुमान मंदिर परिसरात निराधार ज्येष्ठ नागरिकांना मिष्टान्न भोजनचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, किरणताई संपत बारस्कर आणि माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन मन्नूशेठ झंवर, सतीश ढवण, गजेंद्र भांडवलकर, योगेश एरंडे, प्रांजली सपकाळ, गायत्री मुंढे, जयश्री पोटे, ह.भ.प. पूजाताई अळकुटे-माने, माधवी माळगे, संगीताताई सपकाळ, गुलनाज शेख, लक्ष्मीताई पारधे, सुरेखाताई आमले, संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, रमेश वराडे, सर्वेश सपकाळ, जहीर सय्यद, ईवान सपकाळ, शिवम भंडारी, ताराचंद ठोकळ, अशोक पराते, दिलीप ठोकळ, छावणी परिषदेचे माजी उपाध्यक्ष संभाजी भिंगारदिवे, विलास तोडमल, सतीश सपकाळ, अभिजीत सपकाळ, शशांक अंबावडे, अर्जुन बेरड, अशोक लोंढे, विलास आहेर, रतन मेहेत्रे, छोटू जाधव, दिनेश लंगोटे, दीपक धाडगे, मनोहरराव दरवडे, सुधीर कपाळे, दीपक घोडके, शशिकांत बोरुडे, भगवान दळवी, काशिनाथ साळुंखे, योगेश करांडे, राजेंद्र माळगे, प्रशांत भिंगारदिवे, अविनाश जाधव, राजू कांबळे, गोकुळ भांगे, दीपक लिपाणे, मंगेश मोकळ, यश भिंगारदिवे, संपत बेरड, मच्छिंद्र भिंगारदिवे, जनाभाऊ भिंगारदिवे, विशाल भामरे यांच्यासह स्नेहालय संचलित ऊर्जा बाल भवनचे गुलनाज सय्यद, सुप्रिया सदलापूरकर, रीमशा शेख, अंजुम शेख, आरती सदलापूरकर आदी उपस्थित होते.





हरदिन मॉर्निंग ग्रुप आणि भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. तसेच शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर बालभवनमधील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याशिवाय रोकडेश्वर हनुमान मंदिर परिसरात निराधार ज्येष्ठ नागरिकांना मिष्टान्न भोजनचे वाटप करण्यात आले.

वृक्षारोपणानंतर बालभवनमधील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यावेळी आनंदाचे भाव दिसून आले. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षाची प्रेरणादायी सुरुवात मिळाली. त्यानंतर रोकडेश्वर हनुमान मंदिर परिसरात निराधार आणि गरजू ज्येष्ठ नागरिकांसाठी मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले.

संजय सपकाळ म्हणाले की, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून मागील २६ वर्षांपासून योग, प्राणायाम, आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. वृक्षारोपण करून थांबणे हा आमचा हेतू नसून त्या वृक्षांचे संवर्धन करणे हे आमचे ध्येय आहे. आजपर्यंत हजारो वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्यात आले आहे. समाजातील गरजू घटकांना मदत, मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देत सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. ते पुढे म्हणाले, आमदार संग्राम जगताप यांनी नेहमीच सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. शहर विकासाबरोबरच भिंगार उपनगराच्या विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. सुमारे १० कोटी रुपयांच्या निधीतून विविध विकासकामांना चालना मिळाली. भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योग भवन उभारून नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीचा नवा पर्याय उपलब्ध करून दिला. भिंगारच्या विकासासाठी त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांनी विकासकामांसोबतच समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांना आधार देण्याचे कार्य केले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी केवळ पायाभूत सुविधांवर भर न देता सामाजिक प्रश्नांकडेही संवेदनशीलतेने पाहिले. राजकारणातून समाजकारणाची वाट चालत जनसेवेचे कार्य त्यांच्या हातून घडत आहे. अशा लोकप्रतिनिधींचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करणे ही प्रेरणादायी बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

किरणताई बारस्कर म्हणाल्या की, शहराचा सर्वांगीण विकास हा आमदार संग्राम जगताप यांचा ध्यास आहे. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, क्रीडा आणि पर्यावरण या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून विकासकामे मार्गी लावली. सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. त्यामुळेच नागरिकांचा त्यांच्यावर दृढ विश्वास असल्याचे त्या म्हणाल्या.

सचिन चोपडा म्हणाले, पर्यावरणाचे रक्षण ही काळाची गरज आहे. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून वृक्षारोपण आणि संवर्धनाचे उल्लेखनीय कार्य सुरू आहे. या उपक्रमांना आमदार संग्राम जगताप यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. पर्यावरण संवर्धनासाठी शासनाबरोबरच नागरिकांचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करण्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात ह.भ.प. पूजाताई आळकुटे-माने यांना हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने प्रदान करण्यात आलेल्या 'अहिल्याबाई होळकर कर्तृत्ववान महिला गौरव पुरस्कार' मिळाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# कर्जमाफीच्या जाचक अटींविरोधात २३ जूनला सर्वपक्षीय, शेतकरी संघटनेचे आंदोलन

## खासदार नीलेश लंके यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

पारनेर – राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कृषी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, तसेच शेतकरी हिताच्या विविध मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा २३ जून रोजी पारनेर तालुक्यात आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शेतकरी, सामाजिक व सर्वपक्षीय संघटनांनी दिला आहे.

यासंदर्भात खासदार लंके यांनी गुरुवारी तहसीलदार गायत्री सैंदाने यांची भेट घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे निवेदन सादर केले. या निवेदनात कर्जमाफी योजनेतील विविध अटींमुळे मोठ्या संख्येने शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याची बाब अधोरेखित करण्यात आली आहे.



राज्य शासनाने शेतकरी हिताच्या विविध मागण्यांबाबत खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शेतकरी, सामाजिक व सर्वपक्षीय संघटनांनी तहसीलदार गायत्री सैंदाने यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात जाहीर झालेल्या योजनेत अनेक निर्बंध घालण्यात आल्याने शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात सन २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेतील मर्यादा हटविणे, १२ लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांवरील अटी रद्द करणे, प्रोत्साहनपर अनुदानासाठीची दोन वर्षे नियमित कर्जफेडीची अट हटविणे, पीकविमा योजनेतील जाचक ट्रिगर अटी रद्द करणे आणि खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांचे पुनर्गठन करण्याच्या मागण्यांचाही समावेश आहे.

याशिवाय पेट्रोल, डिझेल आणि घरगुती एलपीजी गॅसच्या वाढत्या दरांमध्ये कपात करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, पारनेर तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत शेतकरी प्रश्नांवर सर्वपक्षीय संघटना एकवटल्याचे चित्र पाहायला मिळाले. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास २३ जून रोजी पारनेर तालुक्यातील सर्व प्रमुख रस्ते बंद करून रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. पारनेर तालुक्यासह राज्यातील विविध भागांत मागण्या मान्य होईपर्यंत लोकशाही मार्गाने टप्प्याटप्प्याने आंदोलन उभारण्यात येणार असल्याचेही खासदार नीलेश लंके यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी हा लढा असून शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



माळीवाड्यात बकरी ईदला मांस फेकणाऱ्या महिलेला पकडल्याबद्दल कोतवालीचे पो.नि. संभाजी गायकवाड यांचा सत्कार करताना नगरसेवक शम्स खान, फरहान शेख, तारिक कुरेशी, अजिम राजे, वसीम शेख, अजहर शेख, अज्जू शेख, वाहिद शेख, अल्फैज खान, तारिक सय्यद, टिपू शेख, आणि लतीफ खान आदि.

# माळीवाड्यात मांस फेकणारी 'ती' बुरखाधारी महिला पकडली

नगर – बकरी ईदच्या दिवशी शहरात धार्मिक तेढ निर्माण करून दंगलीची ठिणगी टाकण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी एका महिलेचा कोतवाली पोलिसांनी अत्यंत चातुर्याने आणि तांत्रिक कौशल्याने शोध घेतला आहे. माळीवाडा परिसरातील ब्राह्मण गल्लीत मांस फेकून पसार झालेल्या 'त्या' बुरखाधारी महिलेला कोतवाली पोलिसांनी अखेर बेड्या ठोकल्या आहेत. स्वाती विक्रम भोसले (वय ३९, रा. कामरगाव) असे या महिलेचे नाव असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या निंदनीय प्रकारामुळे संपूर्ण शहरात प्रचंड तणाव निर्माण झाला होता आणि नागरिकांमधून तीव्र संतापाची लाट उसळली होती. घटनेचे गांभीर्य आणि संवेदनशीलता ओळखून कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. परिसरातील शेकडो सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रिक विश्लेषण आणि गुप्तहेरांकडून मिळालेल्या अचूक माहितीच्या आधारे पोलिसांनी दिवस–रात्र एक करून संबंधित संशयित महिलेचा शोध घेतला आणि तिला ताब्यात घेतले. तिने गुन्ह्याची कबुली दिली असून अधिक चौकशी केल्यावर आपण भिक मागून आपला व आपल्या ३ मुलांचा उदरनिर्वाह करते, बकरी ईद च्या दिवशी आपण शहरात मांस मागण्याकरिता आलो होतो. भिक्षेत मिळालेल्या मांस मधील तो तुकडा न आवडल्याने आपण फेकून दिला होता. असे तिने तपासात सांगितल्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी सांगितले.

नगर शहराला दंगलीच्या खाईत लोटणारा हा विकृत कट हाणून पाडल्याबद्दल आणि संशयित महिलेला तात्काळ ताब्यात घेतल्याबद्दल नगरसेवक शम्स खान फ्रेंड्स सर्कल च्या वतीने पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड व त्यांच्या संपूर्ण पथकाचा कोतवाली पोलीस ठाण्यातच शाल, पुष्पगुच्छ देऊन जंगी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक शम्स खान, फरहान शेख, तारिक कुरेशी, अजिम राजे, वसीम शेख, अजहर शेख, अज्जू शेख, वाहिद शेख, अल्फैज खान, तारिक सय्यद, टिपू शेख, लतीफ खान आदी उपस्थित होते.

# 'दंगल नको, रोजगार द्या', धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या खऱ्या मास्टरमाईंडचा पोलिसांनी छडा लावावा : किरण काळे

### पोलिसांनी गंगा उद्यान नमाज पठन प्रकरणाचा देखील लवकरात लवकर छडा लावावा, ठाकरे शिवसेनेची मागणी

नगर – अहिल्यानगर शहरात काही समाजकंटकांना आपल्या राजकीय स्वार्थासाठी दंगल घडवून आणायची आहे. दंगल ही व्यापार, उद्योग, समाजाला उद्ध्वस्त करते, बेरोजगार करते. नगरकरांना दंगल नको शांतता हवी आहे. उद्योग, व्यापारासाठी सकारात्मक वातावरण, तरुणाईला दर्जेदार शिक्षण आणि याच शहरात रोजगार, एमआयडीसीत राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्या आयटी पार्क हवा आहे. गोरगरीब, कष्टकरी, कामगारांना सुखाने व शांततेने पोट भरता यावे, एवढीच माफक अपेक्षा त्यांची आहे. त्यामुळे माळीवाडा गोमांस प्रकरणातील भोसले नामक आरोपी महिलेला अटक करून धार्मिक तेढ निर्माण करू पाहणाऱ्यांचा पर्दाफाश केल्याबद्दल पोलीस दलाचे विशेष कौतुक आम्ही करतो. मात्र पोलिसांनी आता पूर्ण सत्य समोर आणण्यासाठी खऱ्या समाजकंटक मास्टरमाईंडचा छडा लावावा, अशी मागणी ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांच्याकडे केली आहे.



माळीवाडा गोमांस प्रकरणाचा पर्दाफाश केल्याबद्दल अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक यांचा सत्कार करताना ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे. समवेत रिपाई गवई गटाचे जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख पै. दीपक भोसले, राम वाणी, चंद्रकांत उजागरे, राम झिने, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना रणशूर, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, राम धोत्रे, किशोर कोतकर, शंकर आव्हाड, विनोद शिरसाट, स्वप्निल साठे, धनंजय देशमुख आदी.

बकरी ईदच्या रात्री माळीवाडा येथील ब्राह्मण गल्लीत गोमांस टाकल्याचा प्रकार उघड झाला होता. यामुळे मोठा तणाव निर्माण झाला होता. दीडशेहून अधिक सीसीटीव्ही फुटेजचे पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण केले. पोलिसांच्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षकांचा सन्मान ठाकरे शिवसेना, रिपाई गवई गट व नगरकरांच्या वतीने भारतीय संविधानाची उद्देश पत्रिका देऊन करण्यात आला. यावेळी कोतवालीचे निरीक्षक संभाजीराव गायकवाड आणि संपूर्ण टीमचे देखील आभार मानण्यात आले.

यावेळी रिपाई गवई गटाचे जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख पै. दीपक भोसले, राम वाणी, चंद्रकांत उजागरे, राम झिने, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना रणशूर, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, राम धोत्रे, किशोर कोतकर, शंकर आव्हाड, विनोद शिरसाट, विजय शिरसाट, धनंजय देशमुख आदी उपस्थित होते.

#### आरोपीचा जबाब न पटणारा

किरण काळे म्हणाले, भीक मागून उदरनिर्वाह करते. त्यावेळी कुणीतरी दिलेला पण नको असलेल्या मांसाचा तुकडा माळीवाड्यात टाकला, हा आरोपीचा जबाब कदापि पटणारा नाही. मुळात भीक मागण्यासाठी मुस्लिम वेश परिधान करणे, संशयास्पद वाटाव्या अशा हालचाली करणे अनेक प्रश्न उपस्थित करतात. भीक म्हणून मांस कोण देतं? हा आरोपीचा बनाव आहे. केवळ अर्धसत्य समोर आले आहे. पोलिसांनी पूर्ण सत्य समाजासमोर आणावे. त्यासाठी घटना घडण्याआधी व नंतर आरोपी कोणाच्या संपर्कात होती, तिला कोणाचे राजकीय पाठबळ होते का, त्याचा शोध घ्यावा. आरोपीचा सीडीआर, टॉवर लोकेशन तपासावे, अशी मागणी यावेळी काळे यांनी केली.

#### गंगा उद्यान प्रकरणाचा छडा लावा

गंगा उद्यान नमाज पठन प्रकरणाचा देखील सखोल तपास पोलिसांनी करावा. भारतीय मुस्लिम काब्याकडे, सूर्यास्ताच्या दिशेने तोंड करून नमाज पठण करतात. मात्र गंगा उद्यान प्रकरणात उत्तर दिशेकडे तोंड करून नमाज पठण केल्याचे समोर आले आहे. धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी काही समाजकंटकांचे यामागे षडयंत्र आहे का? याचा लवकरात लवकर पोलिसांनी छडा लावावा, अशी मागणी यावेळी किरण काळे यांनी केली.

# डिझेल खरेदीवर केंद्र सरकारचे निर्बंध; एका व्यक्तीला २०० लिटरचे बंधन

### पेट्रोल पंपांना दिले अंमलबजावणीचे आदेश; ९० दिवसांसाठी लागू केली बंदी

नवी दिल्ली – गेल्या अनेक दिवसांपासून आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्याची स्थिती दोलायमान आहे. त्यामुळे अखेरीस केंद्र सरकारने संभाव्य टंचाई टाळण्यासाठी सामान्य ग्राहकांना २०० लिटर डिझेल खरेदीची मर्यादा घातली आहे तर व्यावसायिक वापरकर्त्यांना किरकोळ पेट्रोल पंपांवरून इंधन खरेदी करता येणार नाही, असा आदेश काढला आहे. ही बंदी सुरुवातीच्या ९० दिवसांसाठी लागू राहील, असेही या आदेशात म्हटले आहे. पेट्रोलियम मंत्रालयाने ११ जून रोजी हा नवीन आदेश जारी केला आहे.

या निर्णयामागील मुख्य कारण म्हणजे देशातील विविध भागांत किरकोळ पंपांवर अचानक वाढलेली असामान्य विक्री हे आहे. तपासात असे समोर आले आहे की, किरकोळ आणि घाऊक इंधन दरांमध्ये मोठा फरक असल्याने अनेक कारखाने, टेलिकॉम टॉवर कंपन्या, बांधकाम व्यावसायिक आणि मोठ्या वाहतूक संस्थांनी घाऊक पुरवठादार सोडून थेट सामान्य पेट्रोल पंपांकडे मोर्चा वळवला होता. दिल्लीसारख्या शहरांचे उदाहरण दिल्यास, किरकोळ पंपांवर डिझेल ९५.२० रुपये प्रति लिटर दराने मिळत आहे, तर घाऊक खरेदीदारांना तेच डिझेल सुमारे १३४.५० रुपये दराने मिळत आहे. हा तब्बल ३९.३० रुपयांचा फरक असल्यामुळे मोठ्या संस्था स्वस्त इंधन मिळवण्यासाठी सामान्य पेट्रोल पंपांचा वापर करत होत्या. परिणामी सामान्य जनतेसाठी इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला होता.

या नवीन आदेशानुसार, आता कारखाने आणि व्यावसायिक संस्थांना त्यांच्या अधिकृत ग्राहक पंपांवरून किंवा निश्चित केलेल्या बल्क सप्लाय चॅनेलद्वारेच इंधन खरेदी करावे लागेल. इंधन विक्रीच्या या नवीन नियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्राती इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्यांवर सोपवण्यात आली आहे.

सामान्य ग्राहकांसाठी इंधन खरेदीची मर्यादा स्पष्ट करताना, डिझेल केवळ वाहनांच्या टाकीत किंवा पेट्रोलियम अँड एक्सप्लोसिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशनद्वारे मंजूर असलेल्या कंटेनरमध्येच भरता येईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आवश्यक वस्तू कायद्यांतर्गत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. राज्य सरकारांना साठेबाजी आणि काळाबाजारावर नियंत्रण ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, सरकारने देशात इंधनाची कमतरता नसल्याचे स्पष्ट करत नागरिकांनी घाबरून जास्तीची खरेदी न करण्याचे आवाहन केले आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **१. शरीफबानो उर्फ शरीफाबानो जानसाहब शेख, २. शेख मोहंमद शरीफ मोहंमद इब्राहिम, ३. अब्दुल करीम अकबर शेख, ४. इरफान उर्फ इरफाना मोसीन सय्यद, ५. गुलजार बानो मोहम्मद अय्युब, ६. कमरबानो अकबर शेख सर्व रा. दर्गा दायरा, नागरदेवळे, अहिल्यानगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन विद्यमान मालक यांनी सदर मिळकत विक्री करण्याचे ठरविलेले असुन आमच्या अशिलाकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **१५ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट - मिळकतीचे वर्णन :-** जिल्हा तुकडी अहिल्यानगर, पोट तुकडी तालुका नगर पैकी अहिल्यानगर जिल्हा परिषद पैकी पंचायत समिती पैकी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे **नागरदेवळे** येथील मे. सब रजिस्ट्रार साहेब, अहिल्यानगर यांचे हद्दीतील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| गट नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. | यांसी चतु:सिमा |
|---|---|---|---|
| | | | सरकारी रेकॉर्ड प्रमाणे (ताबा/कब्जे वहिवाटी प्रमाणे) |
| ७६/१ | ४.८६<br>पो.ख.०.०१<br>०.३५ | ४.८६ | यापैकी विद्यमान मालक नं. १ यांचे मालकीची संपुर्ण ० हे.२६ आर + पोख ० हे. ०१ आर अशी एकुण ० हे. २७ आर जमीन मिळकतीबाबत |

| गट नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. | यांसी चतु:सिमा |
|---|---|---|---|
| | | | सरकारी रेकॉर्ड प्रमाणे (ताबा/कब्जे वहिवाटी प्रमाणे) |
| ७६/२ | ०.३३ | ४.७७ | यापैकी विद्यमान मालक नं. २ यांचे मालकीची संपुर्ण ० हे.२८ आर जमीन मिळकतीबाबत. |

| गट नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. | यांसी चतु:सिमा |
|---|---|---|---|
| | | | सरकारी रेकॉर्ड प्रमाणे (ताबा/कब्जे वहिवाटी प्रमाणे) |
| ७६/३ | ०.१२ | १.१२ | यापैकी विद्यमान मालक नं. ३ ते ६ यांचे मालकीची संपुर्ण ० हे. १० आर जमीन मिळकतीबाबत. |

| गट नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. | यांसी चतु:सिमा |
|---|---|---|---|
| | | | सरकारी रेकॉर्ड प्रमाणे (ताबा/कब्जे वहिवाटी प्रमाणे) |
| ७७/१ | ०.०२ | ०.३१ | या संपुर्ण विद्यमान मालक नं. १ ते ६ यांचे मालकीच्या जमीन मिळकतीबाबत. |

| गट नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. | यांसी चतु:सिमा |
|---|---|---|---|
| | | | सरकारी रेकॉर्ड प्रमाणे (ताबा/कब्जे वहिवाटी प्रमाणे) |
| ७७/३ | ०.२१ | ३.५३ | यापैकी विद्यमान मालक नं. ३ ते ६ यांचे मालकीची संपुर्ण ० हे. १७ आर जमीन मिळकतीबाबत. |

**सदर वर नमुद सर्व गट नंबर मधील क्षेत्र मिळुन एकुण ० हे. ८४ आर होत असुन त्या पैकी ० हे१० आर क्षेत्र (कोणत्याही एका बाजुला विद्यमान मालक यांचे राहील) सदर क्षेत्र सोडुन उर्वरित संपूर्ण ० हे. ७४ आर क्षेत्राबाबत.**

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. १२/०६/२०२६
अहमदनगर.

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
पत्ता :- जुने जिल्हाधिकारी कार्यालय, डावरे गल्ली, अहमदनगर - ४१४००१
मो.बा.९८८१४३१८६०/७२७६२५२४७८

डीटीपी ऑपरेटर पाहिजे
कोरल-ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप, इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले
कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर
Mo. 9823115157

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता. १२/०६/२०२६**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर हद्दीतील मौजे **भिंगार** येथील खालील वर्णनाची प्लॉट मिळकत –

**सर्व्हे नं.३३७/३/२ मधील प्लॉट नं. १/१ चे एकुण क्षेत्रफळ १९४.८१ चौ.मी. हा संपुर्ण प्लॉट**

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – ६.०० मीटर रुंदीचा रस्ता दक्षिणेस – प्लॉट नं.१/७
पश्चिमेस – प्लॉट नं.१/२ उत्तरेस – १२.०० मीटर रुंदीचा रस्ता

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक -**
**शेख कुतबुद्दीन शहाबुद्दीन,**
रा.मुकुंदनगर, अहिल्यानगर

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :- ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर.
मो. नं. ९०११६७८९९९ / ९८६०८०५५५९

# संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्यात 'प्रकल्प वर्षा' राबवून कृत्रिम पाऊस पाडावा

नगर – संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'प्रकल्प वर्षा' राबवुन कृत्रिम पाऊस पाडावा अशी मागणी माजी पंचायत समिती तथा भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी शासनाकडे केली आहे.

महाराष्ट्रामधे यावर्षी कमी पावसाची शक्यता विविध हवामान तज्ज्ञ, हवामान अभ्यासक आणि हवामानविषयक संस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. जुनच्या मध्यापर्यंत पावसाची हजेरी अद्याप लागलेली नाही. त्यामुळे संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने सन २००५ मध्ये बंद केलेला प्रकल्प वर्षा पुन्हा सुरू करून राज्यात कृत्रिम पाऊस (Cloud seeding) कार्यक्रम राबवावा.

कृत्रिम पाऊस म्हणजे वातावरणातील उपलब्ध पावसाळी ढगांमध्ये विशिष्ट पदार्थांची फवारणी करून पाऊस पडण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची वैज्ञानिक प्रक्रिया होय. भारतातील विविध राज्यांनी याचा वापर केला आहे . विशेषतः आंध्र प्रदेशने हायग्रोस्कोपिक तंत्रज्ञानाचा वापर करून सकारात्मक परिणाम मिळाले आहेत.

कृत्रिम पाऊस प्रकल्पासाठी काही कोटी रुपयांचा खर्च येऊ शकतो. मात्र दुष्काळ पडल्यास शासनाला माणसांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकर व्यवस्था, जनावरांसाठी पाणी आणि चारा छावण्या, मजुरांना रोजगार हमी योजनेची कामे, जलटंचाई निवारण उपाययोजना तसेच विविध प्रशासकीय खर्चांवर शेकडो कोटी रुपये खर्च करावे लागतात. त्या ऐवजी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कृत्रिम पाऊस प्रकल्प राबविणे अधिक फायदेशीर ठरेल.

याशिवाय दुष्काळी परिस्थितीत निर्माण होणारी पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याची समस्या, रोजगार हमी योजनांवरील वाढता ताण आणि काही ठिकाणी होणाऱ्या गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठीही कृत्रिम पाऊस हा प्रभावी पर्याय ठरू शकतो.

यासाठी महाराष्ट्र शासनाने तातडीने प्रकल्प वर्षा पुनरुज्जीवित करून आवश्यक रडार, विमाने, हवामान निरीक्षण यंत्रणा आणि क्लाऊड सीडिंगसाठी लागणारी संपूर्ण यंत्रणा तातडीने उभारून कृत्रिम पाऊस पाडावा आणि शेतकरी आणि सामान्य जनतेला धीर द्यावा अशी मागणी भारतीय जनसंसदचे राज्य निमंत्रक अशोक सब्बन, सरपंच कैलास पठारे, अशोक ढगे, वीर बहादुर प्रजापती, सुनील टाक, परदेशी, भगवान जगताप, भोसले, पोपटराव साठे व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.



गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करताना सनी वागस्कर व मित्र परिवार

# गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

नगर – सनी वागस्कर व मित्र परिवाराच्या वतीने तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास आ. संग्राम जगताप, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, प्रकाश भागानगरे, महेश तवले, निलेश बांगरे, डॉ. सुनील भगत, अशोक काळे, अभिराज वागस्कर,अभिषेक घटमाळ, राहुल गिल्डा, वैभव गांधी, सुभाष चोभे, राहुल बुरा, भागवत कुरधने, संतोष लांडे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ तसेच बालघर प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात सनी वागस्कर म्हणाले, आ.संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम राबवावा, असा संकल्प केला. त्यानुसार गरजू, गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी मित्र मंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले तर अभिषेक घटमाळ यांनी आभार मानले.

# फ्लॅट विकणे
शिवांकूर रेसिडेन्सी, धर्माधिकारी मळा, सावेडी येथे 2BHK ग्राऊंड फ्लोअर वरील फ्लॅट विकणे.
8811909767 / 8471934833

## एन. ए. प्लॉट विकणे आहे
अहिल्यानगर इंडस्ट्रियल इस्टेट, केडगाव मागे, भूषणनगर लिंक रोड जवळ, 5525 स्क्वे.फूट प्लॉट विकणे आहे.
- संपर्क -
9130576131
9623476131

## PEST CONTROL च्या कामासाठी त्वरित मुलगा पाहिजे
१०वी/१२वी/पदवीधर
स्वत:ची गाडी पाहिजे
(कर्जत परिसर)
9404236274
8329447598

## पाहिजेत
घरकामासाठी व स्वयंपाकासाठी मावशी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे, जोडी असल्यास प्राधान्य (आकर्षक पगार, राहण्याची सोय)
- समक्ष भेटा -
डॉ. शेख निसार
निसार हॉस्पिटल, सिव्हिल हडको, अ.नगर
भेटण्याची वेळ : सायंकाळी ७ वाजता
9823018408

## कार वॉशिंग कामासाठी पार्ट टाईम मुले पाहिजेत
पगार ७००० रु.
9552445100

## हॉस्पिटलसाठी अर्जंट हाऊसकीपिंग स्टाफ पाहिजे
* मावशी – ४० जागा
* मामा – ४० जागा
संपर्क : 8421086174, 9067880018, 7066316963






## विकणे आहे
टाटा Nexon इलेक्ट्रिक जून २०२२
- ८ वर्ष बॅटरी वॉरंटी
- शो रूम कंडिशन
- रनिंग ११८००० कि. मी.
- मोरपंखी रंग
- सिंगल ओनर
- नवीन टायर्स

अपेक्षा ६.५० लाख
संपर्क
9822493623

## नामांकित सुसज्ज अशा शोरुममध्ये कामासाठी पाहिजेत
शर्ट मेकर ५ जागा
पॅन्ट मेकर ५ जागा
सेल्समन २ जागा
(आकर्षक पगार)
डि. चंद्रकांत, चितळे रोड, अहिल्यानगर
Mo. 7083969199

## फ्लेक्स प्रिंटींग
संपर्क : 9403232323






## पाहिजेत
एम.आय.डी.सी मधील एका नामांकित औषधाच्या सि. ॲण्ड एफ. (डेपो) साठी खालील जागा भरणे आहे.
* कॉम्प्युटर ऑपरेटर : जागा – २
* औषधे पॅकिंगकरिता मुले/मुली : जागा – ४
* पेट्रोल पंपावर कामासाठी मुले : जागा – २

संपर्क : ॲबट पेट्रोलपंप | फ्रेंड सर्व्हिस स्टेशन, पेट्रोलपंप, कोठला रोड, अहिल्यानगर









अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या

## स्त्रियांच्या समस्या
- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य

डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
(३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)

1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

## स्कूल बॅग्ज्
भरपूर व्हरायटीज । रिजनेबल रेट
* रु.२०० पासून रु.१५०० पर्यंत
* रु. १००० पुढील किंमतीचे स्कूल बॅगवर ३० ते ५० टक्केपर्यंत सूट तसेच दै. नवा मराठातील या जाहिरातीचे कात्रण किंवा फोटो घेऊन येणारास अजून रु.१०० सूट
* टिफीन बॅग, स्कूल पाऊच उपलब्ध.

वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188






दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : ५ ते ११ जून २०२६
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

**SCREEN - 1**
हे जवानी तो इश्क होना है
12.00 pm 150/-
3.00 pm 150/-
9.00 pm 150/-

पेड्डी
9.00 am 100/-
6.00 pm 150/-

**SCREEN - 2**
देऊळबंद २ मराठी
9.00 am 100/-
12.00 pm 150/-
3.15 pm 150/-
9.15 pm 150/-

तुंबाडची मंजुळा
6.30 pm 150/-


कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
आशा स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : ४ ते ११ जून २०२६

| | | |
|---|---|---|
| तुंबाडची मंजूळा | मराठी | 10.15 AM, 4.25 PM |
| कृष्णाअवतारम | हिंदी | 1.05 PM |
| हिमॅन ॲण्ड द मास्टर्स ऑफ द युनिव्हर्स | हिंदी | 1.50 PM, 7.15 PM |
| राजे शिवाजी | मराठी | 3.50 PM |
| बंदर | हिंदी | 7.30 PM, 10.15 PM |
| देऊळबंद २ | मराठी | 8.00 AM, 10.30 AM, 2.55 PM |
| हे जवानी तो इश्क होना है | हिंदी | 8.00 AM, 11.35 AM, 2.10 PM, 4.45 PM, 7.20 PM, 10.00 PM |
| पती पत्नी और वो दो | हिंदी | 8.00 AM |
| पेड्डी | हिंदी | 8.10 AM, 11.30 AM, 9.40 PM |
| | तेलगु | 6.10 PM |

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001







आशीर्वाद
स्व. अरुणकाका जगताप
मा.श्री.सचिनभाऊ जगताप
मा.जि.प.सदस्य
मा.श्री.विकीशेठ जगताप
नगरसेवक
भैय्या..
अहिल्यानगर जिल्ह्याची आन बाण शान
हिंदुत्ववाचा बुलंद आवाज
अहिल्यानगर शहराच्या मनावर
राज्य करणारं अद्‌भुत व्यक्तिमत्व
हिंदूधर्म रक्षक
मा.श्री. आमदार
संग्रामभैय्या
जगताप
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
रामचंद्र गेणुजी दिघे (आण्णा)
आकाश अजय दिघे
अजय रामचंद्र दिघे
विक्रांत मच्छिंद्र दिघे
विजय रामचंद्र दिघे
धनवान मच्छिंद्र दिघे
जय अजय दिघे




स्व. अरुणकाका जगताप
मा. आमदार
स्व. शिवाजीराव कर्डिले
मा.मंत्री
स्व. अजितदादा पवार
मा. उपमुख्यमंत्री
१२ जून
हिंदुत्वाची पताका उंचावणारे, समाजासाठी सदैव तत्पर असणारे
जनतेचे लाडके नेतृत्व, युवकांचे प्रेरणास्थान
हिंदू धर्मरक्षक
कार्यसम्राट आमदार
श्री. संग्रामभैय्या जगताप
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छूक - रोहन मांडे


आशीर्वाद
मा. अनिलराव शिरोळे
मा. खासदार, पुणे
मा. मुरलीधर (आण्णा) मोहोळ
केंद्रीय मंत्री, भारत सरकार
मा. सिध्दार्थदादा अनिलराव शिरोळे
आमदार, छत्रपती शिवाजीनगर, पुणे
नगरकरांच्या
हृदयावर राज्य करणारे !
लोकप्रिय कार्यसम्राट आमदार
मा.श्री. संग्रामभैय्या अरुणकाका जगताप
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
VISIONARY
DYNAMIC LEADER
शुभेच्छुक
प्रशांत मारुती शिरोळे
(कांदा, बटाटा, भुईमूग शेंग, लसूण इ. चे कमिशन एजंट)
गाळा नं. 13, कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर
गाळा नं. 23, कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेर, अहिल्यानगर
9822820005
BRAND MAKER